दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ५ वे अंक –१९५ शुक्रवार, दि.२१ मार्च २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-195 Friday, Dt.21 March 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# बीडमध्ये आणखी एक हत्याकांड, दोन भावांची निर्घृण हत्या; ६ जणांवर मकोका

बीडमध्ये गेल्या काही दिवसांपासून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला तीन महिने उलटले आहेत. या हत्या प्रकरणातील सर्व आरोपींवर मकोका लावण्यात आला आहे.

तसेच बीडमधील खंडणी प्रकरणी अटकेत असलेल्या वाल्मिक कराडवर मकोका लावण्यात आला आहे. आता बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. संतोष देशमुख हत्या आणि खंडणी प्रकरणात वाल्मिक कराडच्या टोळीवर मकोका लावल्यानंतर आता आणखी एका सहा जणांच्या गुन्हेगारी टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या टोळीत तीन महिलांचाही समावेश आहे.

दीपक ऊर्फ सलीम नारायण भोसले, सोमीनाथ ऊर्फ नाज्या दिलीप काळे, मुद्दसर मन्सुर पठाण, सोनी ऊर्फ अनिता गोरख भोसले, शशिकला दीपक भोसले आणि संध्या कोहीनुर भोसले, अशी मकोका लावण्यात आलेल्या आरोपींचे नावे आहेत. या सर्वांचा टोळीत समावेश आहे. या टोळीने बीड, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यात विविध गंभीर गुन्हे केले आहेत.



### गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यास मदत होणार

या टोळीवर खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, अवैध शस्त्र बाळगणे, पुरावे नष्ट करणे, रस्ता अडवणे अशा स्वरूपाचे १३ गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे या टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याचा निर्णय पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी घेतला. सहाय्यक पोलिस निरीक्षक मंगेश साळवे यांनी प्रस्ताव तयार करून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवला. विशेष पोलिस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी या प्रस्तावास मंजुरी दिली. या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यास मदत होणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १६ जानेवारी रोजी वाहिरा ते पिंपळगाव रोडवरील गायरान जमिनीत या आरोपींनी आजिनाथ विलास भोसले आणि भरत विलास भोसले या दोघांची निर्घृण हत्या केली होती. या प्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आता याप्रकरणी सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर अजून तीन जण फरार आहेत.

## स्वयंसहायता बचत गटांच्या जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जीवने यांच्या हस्ते उद्घाटन





बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हा परिषद व पंचायत राज विभागाच्या वतीने उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानच्या वतीने दि. २० मार्च ते २४ मार्च २०२५ या कालावधीत जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर प्रदर्शनाचे उद्घाटन बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या हस्ते गुरुवार दिनांक २० मार्च रोजी करण्यात आले.

जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन २०२५ च्या या गुढीपाडवा महोत्सव, ईद बाजार आणि खाद्य जत्राचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत डॉ. ज्ञानोबा मोकाटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, शिक्षणाधिकारी (निरंतर) संजय पंचगल्ले यांच्या सह मान्यवरांची उपस्थिती होती. जिल्हा परिषदेच्या प्रांगणात उभारलेल्या २५ स्टॉलला सीईओ आदित्य जीवने यांचा सामान्य वाऱ्याने भेटी देऊन खाद्य संस्कृती खाद्य जत्रा व स्टॉलला भेट दिली. सदर विक्री व प्रदर्शनाची दररोज वेळ सकाळी १०.०० ते रात्री ११.०० वाजेपर्यंत आहे. बचतगट स्वयंसहायता समुहातील महिलांच्या प्रगतीचा, महा खरेदीचा उत्सव, महा मेजवानीचा, गुढीपाडवा महोत्सव, ईद बाजार व खाद्य जत्रा जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन २०२५ मध्ये खास आकर्षण मसाले, खाद्यपदार्थ, हस्तकला, ग्रामीण कलाकुसर, ज्वेलरी तसेच शाकाहारी व मांसाहारी मेजवानी व खुप काही आयोजित करण्यात आलेले आहे. उमेद च्या जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनाचा लाभ घ्यावा

## बीड मधील वन्य प्राणी हत्या संदर्भात मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन

### राज्यभरातून प्राणी मित्रांचा प्रतिसाद, एसआयटी स्थापन करून चौकशीची मागणी

मुंबई (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्याच्या शिरूर कासार तालुक्यातील बावी येथील ढाकणे पिता पुत्रांना गंभीर मारहाण करून जिवे मारण्याचा प्रसंग घटल्याची घटना राज्यभर गाजत असताना बीड सह राज्यभरातील प्राणी मित्रांनी मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलनाला सुरुवात केली आहे. या आंदोलनास राज्यभरातून प्राणिमित्रांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून संबंधितावर कडक कारवाई करून केंद्रीय तपासणी यंत्रणे मार्फत तपास करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

बीड जिल्ह्यातील खोक्यांचे प्रकरण राज्यभर गाजत आहे. खोक्याच्या माध्यमातून शिरूर तालुक्यात खोक्याच्या टोळीने प्रचंड दहशत घातल्या प्रकरणी खोक्याला अटक करण्यात आली आहे.परंतु नंतर त्यांच्या टोळी

(उर्वरीत पान २ वर)



बिश्नोई समाजाने घेतली खोक्याने मारलेल्या हरणाची दखल

# नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या पगारी रखडल्या ? कर्मचाऱ्यांवर बोंब मारण्याची वेळ

## फेब्रुवारीच्या वेतनाचा मार्च संपत आला तरी पत्ता नाही !

बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्रात आज जवळपास ३८८ नगरपरिषदा व नगरपंचायती आहेत, यामध्ये अंदाजे १.५ ते २ लाख अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. इतका मोठा राज्य शासकीय व निमशासकीय कर्मचारी वर्ग असून आजही फेब्रुवारी महिन्याच्या वेतनाच्या प्रतीक्षेत आहे. याची ना नगरविकास विभागाला फिकीर पडली आहे ना नगरपरिषद प्रशासन संचालनालयाला देखील पडली नाही. पगार नसल्यामुळे निर्माण झालेल्या अनेक आर्थिक अडचणीचा सामना करावा करताना आज कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना बोंब मारण्याची वेळ आली आहे. सरकार आता तरी डोळे उघडेल का ? कर्मचाऱ्यांना पगारी देऊन त्यांना न्याय देईल का ?

जकातीद्वारे मिळणारा महसूल हा नगरपरिषदांचा आर्थिक कणा असल्याने त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम, स्वावलंबी होत्या.परंतु शासनाने जकात बंद केली.त्याऐवजी वेतन व निवृत्तिवेतनासाठी सहायक अनुदान देणे सुरू केले. दर महिन्याला शासनाचा नगरविकास विभाग सहायक अनुदानाची ठोक



रक्कम नगरपरिषद प्रशासन संचालनालयालय मुंबई यांच्याकडे वर्ग करतो. संचालनालयाकडून राज्यातील सर्व नगरपरिषदांना सहायक अनुदानाचे वितरण होते. शासनाकडून सहायक अनुदान प्राप्त झाल्यावरच नगरपरिषदांच्या अधिकारी- कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्ती वेतनधारकांचे निवृत्तिवेतन अदा केले जाते. गेल्या अनेक वर्षांपासून सहायक अनुदान शासनाकडून वेळेवर मिळत नसल्यामुळे राज्यातील सर्व नगरपरिषदांचे वेतन दर महिन्याला उशिराने दिले जात आहे. तब्बल दोन दोन महिने वेतनास उशीर होत आहे. नगरपरिषद अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन जीवनमानाचा खर्च, अपत्यांचा शैक्षणिक खर्च, वैयक्तिक कर्जाचे हप्ते, औषधपाणी इ. वर या दप्तर दिरंगाईमुळे दरमहा विपरीत

(उर्वरीत पान २ वर)

## १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट अत्यावश्यक

बीड (प्रतिनिधी)

दि.०१.०४.२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी दि.३१/०३/२०२५ पर्यंत बसविण्याचे निर्देश देण्यात आले होते. आजपर्यंत जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्याचे काम फारच कमी झाले असल्याने जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्यासाठी दिनांक ३०.०६.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

तरी सर्व सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रात याबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी, तसेच स्थानिक वाहन वितरक, ऑटोरिक्षा (टैक्सी बस ट्रक संघटनाची बैठक घेऊन याबाबत सर्वांना अवगत करावे, अशा स्पष्ट सूचना श्री विवेक भिमानवार परिवहन आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी राज्यातल्या सर्व आरटीओंना दिल्या आहेत. या आदेशाची दखल घेऊन बीड जिल्ह्यात त्याची किती अंमलबजावणी केली जाते हे पाहणे औसुक्याचे ठरेल.

## खासगी हॉस्पिटलसाठी शुल्क नियामक समिती स्थापन करा : मुळूक, गलधर

जिल्ह्यातील रुग्णांची आर्थिक पिळवणूक थांबण्यासाठी आरोग्यमंत्र्यांना दिले निवेदन

बीड (प्रतिनिधी)

गोरगरीब, वंचित व सर्वसामान्य रुग्णांसाठी शासनाने विविध आरोग्य विषयक योजना सुरु केल्या आहेत. या योजनेअंतर्गत रुग्णांवर मोफत उपचार केले जातात. मात्र बीड जिल्ह्यात आरोग्य योजना लागू असलेल्या खासगी हॉस्पिटलमध्ये रुग्णांना योजनेचा लाभ न देता त्यांना मोठ्या रकमेचे बिल भरायला भाग पाडले जाते. एवढेच





नाही तर खासगी रुग्णालयात आयसीयूच्या नावाखाली रुग्णांची आर्थिक लूट केली जाते. यामुळे खासगी हॉस्पिटलवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यात शुल्क नियामक समिती स्थापन करावी, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी आरोग्यमंत्री

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5



## संपादकीय

# विनाशकालाचे विपरीत

हमासचा समूळ नायनाट हे इस्रायली पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहूंचे प्रमुख उद्दिष्ट; पण त्यानंतर गाझा पट्टीवर नियंत्रण कोणाचे हवे याचे उत्तर ते देत नाहीत...गाझामध्ये हमासशी दोन महिने जणू बळजबरीने युद्धविराम करावा लागलेल्या इस्रायलने अखेरीस मंगळवारी आपले खरे रंग दाखवलेच! सोमवार मध्यरात्रीनंतर गाझातील तीन ठिकाणांवर इस्रायली लढाऊ विमानांनी आग ओकली नि त्यात ४०० हून अधिक जीव भस्मसात झाले किंवा ढिगाऱ्याखाली गाडले गेले. इतक्या मोठ्या प्रमाणात दोन महिन्यांपूर्वी हल्ले झाले असते, तर आश्चर्य वाटण्यासारखे काही नव्हते. पण दरम्यानच्या काळात इस्रायल आणि हमास यांच्यात तात्पुरता शस्त्रविराम झाला. त्या वेळी ओलीस आणि कैद्यांची देवाणघेवाण होण्याबरोबरच कायमस्वरूपी शांततेवर चर्चा सुरू झाली होती. ही चर्चा अनिर्णित होती. पण मोडलेली नव्हती. तिचा निकाल लागण्याआधीच इस्रायलने नव्याने हवाई हल्ले सुरू करून पुन्हा एकदा युद्धजन्य परिस्थिती निर्माण करणे ही बाब, इस्रायली नेतृत्वाच्या हेतूंविषयीचा संदेह अधोरेखित करते. गाझा पट्टीतून हमासचा समूळ नायनाट करणे हे इस्रायली पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहूंचे प्रमुख उद्दिष्ट आहे. पण दर एका हमास नेत्याचा नि:पात करण्यासाठी १०० ते २०० पॅलेस्टिनींना ठार करण्याचे कारण काय, याचे उत्तर देण्याच्या फंदात ते कधी पडत नाहीत.

गाझा पट्टीवर हमासचे नियंत्रण नको मग कोणाचे हवे? कारण पॅलेस्टिनी प्राधिकरण म्हणून जी व्यवस्था आहे ती अतिशय क्षीण आहे. शिवाय तिचे अस्तित्व आणि प्रभाव पश्चिम किनारपट्टीपुरता मर्यादित आहे. हे दोन वेगवेगळे भूभाग. या दुभंगलेल्या पॅलेस्टाइनच्या मधोमध आहे इस्रायल! पॅलेस्टाइनच्या राजकीय शासकांच्या दुर्बलतेचा फायदा घेऊनच अतिरेकी मानसिकतेच्या हमासने गाझा पट्टी या भूभागावर नियंत्रण मिळवले. म्हणजे म्हणायला गेल्यास हमास हे गाझाचे शासक, पण प्रशासक नव्हेत! त्यामुळे पश्चिम किनारपट्टीपेक्षा गाझामध्ये अधिक बजबजपुरी होती. शहाणपण आणि सुव्यवस्थेचा अभावच. याचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न इस्रायलने केला, तेव्हा हमासला (आणि इस्रायललाही) समजणाऱ्या एकाच भाषेत प्रत्युत्तर दिले गेले. त्याची जबर किंमत आता हमासबरोबर गाझावासीयांनाही मोजावी लागत आहे.

त्यात पुन्हा गाझातील अनिकेत, अश्रापांचे दुर्दैव असे, की इस्रायलला डोळे वटारून दटावणारे नेतृत्व वॉशिंग्टनमध्येही राहिलेले नाही. अध्यक्षीय निवडणुकीत जो बायडेन यांच्या नेतृत्वाखालील डेमोक्रॅटिक पक्षाच्या पराभवाने अमेरिकेचे किती नुकसान झाले, हे ज्यांचे-त्यांनी ठरवावे. पण या सत्तापालटाने गाझातील पॅलेस्टिनींचे नुकसान मोजदादीपलीकडचे असेल, याची चुणूकच ताज्या घटनेने मिळाली. कारण नेतान्याहूंना गाझातील हमासला संपवायचे आहे, तर अमेरिकेचे महामहीम डोनाल्ड ट्रम्प यांना पॅलेस्टिनींचे गाझातून समूळ विस्थापनच अपेक्षित आहे! दोन्हींचा हेतू जवळपास सारखाच, मार्ग वेगवेगळे. गाझात ट्रम्पबाबांना आपल्या स्वप्नातील पर्यटन नंदनवन वसवायचे आहे. त्यासाठी 'साफसफाई'चे काम बहुधा नेतान्याहू करत असावेत. गावचा पाटील ज्याप्रमाणे एखाद्या जमिनीच्या तुकड्यावर अवैध ताबा मिळवण्यासाठी पदरी पाळलेल्या गुंडांना धाडतो, तसेच हे.

पॅलेस्टिनींच्या जीविताची नेतान्याहूंना पर्वा नाही नि त्यांच्या हक्कांची ट्रम्पना. चारशेहून अधिक बळी - ज्यांत मोठ्या संख्येने लहान मुले होती - गेल्याच्या बातमीवर व्हाइट हाऊसची प्रतिक्रिया होती 'यास हमास जबाबदार आहे. असे काही होऊ नये यासाठी सर्व इस्रायली ओलिसांची सुटका करावी अन्यथा आकाश कोसळेल, असा इशारा अध्यक्षांनी यापूर्वीच दिला होता'! बायडेन प्रशासन किमान प्रतिक्रियांमध्ये तरी संवेदनशीलता दाखवत होते. ट्रम्प प्रशासन त्यांच्या तुलनेत अधिक 'प्रामाणिक' ठरते! फुकाची संवेदनशीलता हवी कोणास? ताज्या हल्ल्याबद्दल इस्रायलने हमासच्या आडमुठेपणाला जबाबदार धरले. वस्तुस्थिती तशी नाही. तिचा मागोवा घेणे प्राप्तस्थितीत अत्यावश्यक.

बरोबर दोन महिन्यांपूर्वी म्हणजे १९ जानेवारी रोजी इस्रायल आणि हमासदरम्यान प्रथम शस्त्रविराम अमलात आला. याअंतर्गत, दोन्ही बाजूंनी ओलीस आणि युद्धकैद्यांची मुक्तता करणे, इस्रायली सैन्याने गाझा पट्टीतून पूर्ण माघार घेणे हे पहिल्या टप्प्यात अपेक्षित होते. त्याची पूर्तता दोन्ही बाजूंनी जवळपास संपूर्णत: केली. पहिल्या टप्प्यातला शस्त्रविराम १ मार्च रोजी संपुष्टात आला. दुसरा टप्पा सुरू होण्याआधी चर्चा होणे अपेक्षित होते. ही चर्चा अंतिम युद्धसमाप्ती, तसेच उर्वरित ओलीस व युद्धकैद्यांची देवघेव याविषयीची होईल हे पहिल्या टप्प्यात ठरले होते. पहिल्या टप्प्यातील शस्त्रविरामासाठी अमेरिकेने पुढाकार घेतला, त्याचे श्रेय अर्थातच त्या वेळी ट्रम्प यांनी घेतले होते. दुसऱ्या टप्प्याची चर्चा पुढे सरकत नाही तेव्हा परिस्थिती 'जैसे थे' राहणे अपेक्षित होते. पण इस्रायलने पुन्हा एकदा भीषण हल्ले सुरू करून परिस्थिती पहिल्या टप्प्याच्याही आधीच्या अवस्थेत नेऊन ठेवली. याचे इस्रायलकडून दिले गेलेले कारण असे की हमासने पुरेशा संख्येने ओलिसांची मुक्तता केली नाही. हमासचे म्हणणे अर्थातच याउलट. ते असे की संपूर्ण युद्धसमाप्तीशिवाय सगळे ओलीस सोडता येणार नाहीत.

# जिजाऊ ज्ञानमंदिर स्कूल ग्लोबल एज्यूकेशन अवार्ड २०२५ने सन्मानित

मुखेड (प्रतिनिधी)

मुखेड -सन २०१० पासून कार्यरत असलेल्या जिजाऊ ज्ञानमंदिर सेमी इंग्लिश स्कूल ने मुखेड शहरातच नव्हे तर पंचक्रोशीत आपल्या शैक्षणिक कार्याचा व निकालाचा चढता आलेख ठेवत एक वेगळा ठसा उमटवला आहे. गेल्या १५ वर्षापासून शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी व प्राचार्य तथा सचिव जगदीप जोगदंड यांनी केलेले शैक्षणिक कार्य सर्वांचे आकर्षण असून सर्वांगसुंदर निसर्गशाळा म्हणून जिजाऊ ज्ञानमंदिर ही शाळा सर्वार्थाने देखणी तर आहेच पण येथील विद्यार्थी गुणवंत ,यशवंत प्रगतीशील आहेत. जे की आपल्या बुद्धिमतेच्या बळावर बेसिक नॉलेज घेवून खखढ इंजिनिअर , डॉक्टर , क्लासवन अधिकारी पदापर्यंत पोहंचून यशस्वीपणे विविध कार्यक्षेत्रात कार्यरत आहेत. यशस्वी विद्यार्थी हेच या शाळेची खरी कमाई आहे. प्रामाणिक प्रयत्न व धडपड करून शैक्षणिक कार्याबरोबरच आपल्या विद्यार्थ्यामध्ये नैतिक जीवनमुल्ये रुजवून सुसंस्कारीत विद्यार्थी घडविणारी शाळा म्हणून जिजाऊ ज्ञानमंदिर सेमी इंग्लिश स्कूल च्या कार्याची दखल घेवून महाराष्ट्र , कर्नाटक व गोवा राज्यात सक्रीय कार्यरत असलेल्या आधार सोशल फाऊंडेशन बेळगाव च्या वतीने रविवारी १६ मार्च २०२५ रोजी ट्रीया हॉटेल हॉल , स्टेशन रोड , ताराबाई पार्क , टनाटन हॉटेल जवळ कोल्हापूर येथे सन्मानपूर्वक भव्य कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गडहिंग्लज शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन तथा सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. डॉ. पांडूरंग पाटील , सेवानिवृत आयएएस अधिकारी शंभु कृष्णा कल्लोळकर , असिस्टंट डॉयरेक्टर सोशल वेलफेअर डीपार्टमेंट चिकोडीच्या अर्चना एस. साने मॅडम , सेवानिवृत्त प्रादेशिक परिवहन अधिकारी सांगलीचे डॉ. दुर्गाप्पा पवार, न्युरो हॅपीनेस




कोच मुंबईच्या डॉ. अर्चना कोयले मॅडम, कोल्हापूरचे सुप्रसिद्ध प्रवचनकार हभप डॉ. एस.पी. पाटील, बालाजी पॅकेजिंग कंपनी सांगलीचे यशस्वी उद्योजक डॉ. प्रशांत पाटील , कांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे सातारा येथील वंशज डॉ. दिलीप नेवसे , संजय गोडवत , नितीन जाधव, वैशाली मोरे, बँक व्यवस्थापक श्रीनिवास नवले , डॉ. निलेश चौगुले, प्रकाश धनगर, संपादक बाबासाहेब जाधव, आधार सोशल फौंडेशन चे अध्यक्ष डॉ. विक्रम शिंगाडे, प्रिती मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते. 'जगी जीवनाचे सार , घ्यावे जानूनी सत्वर ,

जैसे ज्याचे कर्म तैसे ,
फळ देतो रे ईश्वर ।।

या उक्तीप्रमाणे महाराष्ट्र , कर्नाटक , गोवा राज्यात विविध कार्यक्षेत्रात उल्लेखनिय काम करणाऱ्या संस्था , व्यक्तीविशेषांना आधार सोशल फौंडेशन बेळगाव यांच्यावतीने शाल, श्रीफळ , सन्मानचिन्ह , सन्मानपत्र देऊन विशेष मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानपूर्वक गौरविण्यात आले. याचवेळी जिजाऊ

ज्ञानमंदिर मुखेड ला ग्लोबल एज्यूकेशन अवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी ८९ वर्षाच्या मातोश्री कौतुकबाई जोगदंड , संस्थाध्यक्ष ज्ञानोबा जोगदंड सर सौ. शकुंतला जोगदंड , प्राचार्य जगदीप जोगदंड सौ. शितल जोगदंड यांनी हा पुरस्कार सन्मानपूर्वक स्वीकारला. संस्थाध्यक्ष ज्ञानोबा जोगदंड हे कवी असल्याने त्यांना उत्कृष्ट कवी म्हणून ही गौरविण्यात आले. कोषाध्यक्ष जगदीश जोगदंड यांची शाळेविषयी असलेली तळमळ , दुरदृष्टी व पालकांचा शाळेविषयी असलेला विश्वास , पर्यवेक्षक सुधाकर जोगदंड यांच्या सुनियोजित मार्गदर्शना खाली विद्यार्थ्यांची निरंतर मेहनत यामुळेच हा पुरस्कार सर्वांच्या परिश्रमाचे फळ आहे. याबद्दल सर्वत्र शाळेचे कौतुक होत आहे.

# दारव्हा, यवतमाळ येथे कोष्टी समाजाचा मेळावा -एसबीसी आरक्षण टिकविण्यासाठी सरकारकडे निवेदन

वडवणी (प्रतिनिधी)

दि. १६ मार्च २०२५ रोजी कोष्टी समाजाच्या नारीशक्ती सन्मान सोहळ्याच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने दारव्हा, यवतमाळ येथे समाजातील मान्यवरांनी महाराष्ट्र राज्याचे मंत्री मा. नामदार श्री. संजयजी राठोड यांना विशेष मागास प्रवर्गाचे (डइउ) आरक्षण वाचविण्यासाठी सरकारकडे ठोस प्रयत्न करण्याची मागणी केली. तसेच, मुंबई उच्च न्यायालयात धेींह त्री एरिश्रळीं या संघटनेने डइउ आरक्षणाविरोधात दाखल केलेल्या याचिकेच्या खटल्यात सरकारी पक्षातर्फे निष्णात आणि अनुभवी वकील नेमण्यात यावेत, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली.

या वेळी मंत्री श्री. संजयजी राठोड यांनी डइउ आरक्षण वाचविण्यासाठी सरकार शर्तीचे प्रयत्न करेल, असे आश्वासन दिले. आरक्षण कोणत्याही परिस्थितीत शाबूत राहील आणि त्यास धक्का लागू देणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

महाराष्ट्र सरकारने १९९४ मध्ये डइउ साठी सरकारी नोकरभरतीमध्ये २% आरक्षण देणारी अधिसूचना काढली होती. मात्र, धेींह त्री एरिश्रळीं या संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत या आरक्षणाला आव्हान दिले आहे. याचिकेत दावा करण्यात आला आहे की, हे आरक्षण




असंवैधानिक आहे, कारण एकूण आरक्षण मर्यादा ५०% ओलांडते. तसेच, डइउ जात मागास असल्याचे पुरावे नसल्याचे याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

मुंबई उच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी सुरू असून अंतिम निर्णय प्रलंबित आहे. या खटल्यामुळे महाराष्ट्रातील विशेष मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या कायदेशीर स्थितीवर परिणाम होण्याची शक्यता आहे.समाजाच्या वतीने मंत्री श्री. संजयजी राठोड यांना दिलेल्या निवेदनामुळे आरक्षण टिकवण्यासाठी सरकारकडून पुढील कायदेशीर पाऊले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.या प्रसंगी कोष्टी समाजातील श्री. श्री. श्री. दयानंद पुरी स्वामीजी, श्री. अरूण वरोडे, राष्ट्रीय अध्यक्ष - खऊऊ्घघक्रश्री. सतीशभाऊ दाभाडे, अध्यक्ष, अखिल महाराष्ट्र कोष्टी परीषद, श्री. सुधीर अलोने, श्री. पंडीतराव इदाते, श्री. विष्णूभाउ कुटे, श्री. रमेश घटे, श्री. सचिन देवांग, श्री. राजीवभाउ निवल, श्री. संजय नवले, श्रीमती संगिता बर्वे (मध्य प्रदेश) , श्रीमती मंजुषाताई लोळे, श्री. नारायणराव वड्डे, डॉ. मंदाताई नांदुरकर, श्री. चंद्रशेखर नवरे, श्री.हर्षल अलोने, प्रा. शिवाजी मोहाळे व एसबीसी आरक्षण न्यायालयीन लढा लढणारे श्री. बालाजी चिनके यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# यवतमाळ जिल्ह्यात लहुजी वस्ताद साळवे आणि लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे स्मारक उभारावे – लहुजी शक्ती सेना



यवतमाळ (प्रतिनिधी)

लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष, विष्णुभाऊ कसबे यांनी महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री, माननीय संजयजी राठोड यांची शासकीय निवास्थान, शिवनेरी या बंगल्यावर भेट घेऊन यवतमाळ जिल्ह्यात आद्य क्रांतिगुरु लहुजी वस्ताद साळवे आणि साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे स्मारक उभारण्याची मागणी केली.

विष्णुभाऊ कसबे यांच्या हस्ते मंत्री संजयजी राठोड यांना आद्य क्रांतिगुरु लहुजी वस्ताद साळवे यांची पारंपरिक पगडी, घोगडी आणि लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या सुप्रसिद्ध कादंबरी फकीरा चे प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.या भेटीला लहुजी शक्ती सेनेचे महाराष्ट्र राज्याचे संपर्क प्रमुख नितीन भाऊ वायदंडे, लहुजी शक्ती सेना मुंबई प्रदेश कोर कमिटी अध्यक्ष बाळू भाऊ जाधव, लहुजी शक्ती सेना नांदेड जिल्हा अध्यक्ष प्रीतम भाऊ गवाले, खेसे पाटील यांची उपस्थिती होती.

# महाबँक व्यवस्थापन आजच्या संपातून सुद्धा आडमुठेच राहिले तर आंदोलन उग्र करुन बेमुदत संप करावा लागेल - कॉ. धनंजय कुलकर्णी

बीड (प्रतिनिधी)

मागील तीन ते चार वर्षापासून सातत्याने निवेदने, धरणे आंदोलने, निदर्शने तसेच अनेक वेळा संप करून सुद्धा आवश्यक तितक्या प्रमाणात बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये सर्व संवर्गात नोकर भरती होत नाही. बँक ऑफ महाराष्ट्रचे वरिष्ठ व्यवस्थापन अहंकारयुक्त दर्पाने आंधळे, मुके आणि बहिरे झाले आहे. यांना बँकेच्या उच्च परंपरा,बँकेचे मालक असलेली जनता आणि ग्राहकांचे होणारे हाल, अपुऱ्या कर्मचारी अधिकारी वर्गामुळे त्यांच्या वरील तणाव याकडे मुजोरपने दुर्लक्ष देवून आपल्याच मस्तीत वागत आहे. त्यामुळे या पुढील काळात महाराष्ट्र बँकेतील संघटनेस बेमुदत संप सुद्धा करावा लागला तर त्यास जबाबदार बँकेचे चेअरमन आणि वरिष्ठ व्यवस्थापन जबाबदार असेल, असा इशारा महाबँक कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय नेते कॉ. धनंजय कुलकर्णी यांनी दिला.

आज या बँकेत एक दिवसाचा इशारा संप लातूर शहरात कर्मचाऱ्यांनी निदर्शने करून पूर्ण यशस्वी केला. त्यावेळी निदर्शक बँक कर्मचाऱ्यापुढे बोलताना पुढे ते म्हणाले की,अपुऱ्या कर्मचारी अधिकारी संख्येचा विपरीत तात्काळ परिणाम ग्राहक सेवे वरती होताना दिसून येतो आहे. ग्राहकांना अनेक वेळ ताटकळत रांगेत उभारावे लागत आहे. बँक गेली अनेक वर्षे प्रचंड नफा कमावून उत्कृष्ट कामगिरी करीत आहे, मग या नफ्याच्या बदल्यात ज्या ग्राहकांच्या जीवावर हा नफा कमावला जातो, त्या ग्राहकांना निकृष्ट सेवा देण्याचे दुष्ट धोरण, शोषण करणारे धोरण बँक व्यवस्थापनाने अवलंबीने, हा ग्राहकांचा अवमान आणि कृतघ्नपणा आहे. त्यामुळे उत्कृष्ट सेवेसाठी ओळखल्या जाणाऱ्या बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये ग्राहक सेवेचे बारा वाजलेले आहेत. त्यामुळेच ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र फेडरेशन या ए आय बी ई ए शी संलग्न असलेल्या संघटनेने बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये नोकर भरती या प्रमुख मागणी साठी २० मार्च २०२५ रोजी संपाची हाक दिली असल्याचे बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉ. धनंजय कुलकर्णी यांनी सांगितले. कर्मचाऱ्यांच्या आजारपणासाठी प्रमुख सांसारीक व आवश्यक गरजांसाठी रजा मिळत नाहीत. अनेक शाखा मध्ये शिपाई नाहीत.त्यामुळे तेथील शिपायांची कामे कंत्राटी पद्धतीने करून घेतली जातात, जे ग्राहकांच्या ठेवीदारांना धोकादायक आहे.मागील दहा वर्षात अनेक नवीन शाखा उघडल्या गेल्या व बँकेचा व्यवसाय ही अनेक



पटीने वाढलेला आहे परंतु कर्मचाऱ्यांची संख्या मात्र कमी झाल्याचे दिसून येते आहे.ऑल इंडिया फेडरेशनने तात्काळ नोकर भरतीची मागणी केलेली आहे त्यासाठी आजचा संप अटळ बनल्याचेही कॉ. धनंजय कुलकर्णी यांनी सांगितले. बँकेचे व्यवस्थापन मनमानी पद्धतीने बँक चालवू पाहतआहे.संघटनासोबत केलेल्या करारांचे पालन बँकेकडून केले जात नाही. संघटनांचे ताब्यात घेतलेले ऑफिसेस सुद्धा बँकेच्या व्यवस्थापनाकडून संघटनांना परत दिले जात नाहीयेत. त्यामुळे एकूणच या मनमानी, दादागिरी व हुकूमशाही कारभाराविरोधात संघटनांनी आजचा संप पुकारल्याचे सेक्रेटरी कॉ. दीपक माने यांनी सांगितले. आजचा संप ही व्यवस्थापनाच्या दादागिरी, मनमानी विरोधात व नोकर भरतीच्या प्रमुख मागण्यासाठी होऊ घातलेल्या संघर्षाची सुरुवात असल्याचे व येथून हा लढा आणखी तीव्र बनत जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. उत्तम ग्राहक सेवेसाठी नोकर भरती या प्रमुख मागणीसाठी करीत असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र मधील या संपास ग्राहकांनी पाठिंबा द्यावा असे आवाहन यावेळी उपाध्यक्ष कॉ.उत्तम होळीकर यांनी केले.यावेळी बीड जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी आपल्या शाखेसमोर मागणी फलकासह मुजोर व्यवस्थापन विरोधात घोषणा देत संप साजरा केला. यावेळी विपीन गिरी, गोविंद कुरकुटे, दिगंबर सस्ते, विशाल शिंदे, अश्विनी बांगर, राजश्री रोकडे, कृष्णाथ कवडे, अमोल शिंदे, सुरेश खरगे, कुंडलिक कांबळे, शर्माजी, भागवत गमे, सतीश ढोकने, धापसे, शाम मस्के, विनोद कुमार, आबा कांबळे हे उपस्थित होते. आज बँकेच्या जिल्यातील सर्व १० शाखांचे कामकाज ठप्प होते.यावेळी इतर बँकेतील कर्मचारी संघटनांनी प्रत्यक्ष येऊन या संपास पाठिंबा व्यक्त केला.

पान १ वरून...

**बीड मधील वन्य ..**

कडून आवाज उठवणाऱ्या वर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या नंतर पुढील काळात या टोळीकडून या प्राणी मित्रांना धोका पोहोचू शकतो अशी भीतीही प्राणी मित्रांनी पोलीस विभागाकडे प्रत्यक्ष व लेखी स्वरूपात व्यक्त केलेली आहे.

या पार्श्वभूमीवर आज गुरुवारी मुंबईच्या आझाद मैदानाकडे बीड जिल्ह्यातील प्राणी मित्र दाखल झाले आहेत. अन्य जिल्ह्यामधूनही प्राणिमित्र आझाद मैदानावर येत असून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री साहेबांना विनंती करून खोक्यासह पाठीराख्यांना केंद्रीय तपास यंत्रणासाठी आणि सीआयडीच्या मार्फत तपासणी करून कठोर कारवाई करावी, यासह अन्य मागण्या संदर्भात हे आंदोलन करण्यात येत असल्याचे माध्यमांशी बोलताना उपस्थित प्राणी मित्रांनी सांगितले.

दरम्यान, हरीण, ससे, मोर अशा अन्य प्राण्यांच्या जीवाच्या रक्षणासाठी आणि या प्राण्यांची काळजी घेणाऱ्या प्राणी मित्रांना न्याय देण्यासाठी शासन आणि प्रशासनाने गंभीर दखल घेऊन संबंधित आरोपी आणि त्याच्या पाठीराख्यावर निष्पक्षपणे तपासणी करून या व अन्य माध्यमातून तपास करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी राज्यभरातून जोर धरीत आहे.

बिश्नोई समाजाने घेतली खोक्याने मारलेल्या हरणाची दखल !

शासनाने कारवाई न केल्यास बिस्नोई समाज खोक्यावर कारवाई करणार

पान १ वरून...

असल्याचीही चर्चा मोठ्या प्रमाणावर माध्यमातून दिसून येत आहे. बीड जिल्ह्यातील खोक्या उर्फ सतीश भोसलेने आज पर्यंत शेकडो हरीण मारल्याच्या आरोपवरून आझाद मैदान मुंबई येथे हजारो वन्यजीव प्रेमी उपोषणास बसले असून कार्यवाहीची मागणी करत आहेत. ही बातमी राजस्थानमधील जोधपूरच्या बिस्णोई समजाला मिळाली असता बिस्णोई समाजाचे एक शिष्टमंडळ, उपोषणास्थळी येऊन भेटले. त्यांनी याप्रसंगी सरकारने योग्य ती कार्यवाही नाही केली तर आम्ही जे काय करायचे ते करू ? असा कडक थेट गंभीर इशारा दिला असल्याचे समाज माध्यमातून दिसून येत आहे.

**नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या..**

परिणाम होत आहे.

निवृत्तिवेतनधारकांचे हाल तर विचारूच नका !

सध्या होळी व रमजान असे सर्वधर्मीयांचे सणासुदीचे दिवस असतानाही या सणाचा आनंद मात्र कर्मचारी वेतन न झाल्याने घेऊ शकत नाही. सध्या मार्च महिना असल्यामुळे सर्वच नगरपरिषदांचे अधिकारी- कर्मचारी घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीसाठी उन्हातान्हात फिरत आहेत. वसुली वाढवण्यासाठी सर्वच अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सार्वजनिक सुट्ट्याही रद्द करण्यात आलेल्या आहेत. नगरपालिकेच्या महसुलात वाढ होण्यासाठी कडकडीत उन्हात राब-राब राबणाऱ्या नगरपरिषद कर्मचाऱ्यांवर शासन व उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे किमान माणुसकी म्हणून तरी मेहेरबान होऊन सहायक अनुदान वेळेवर किंवा १ महिना आधीच देणार काय ? असा सवाल सर्वच

पान १ वरून...

नगरपरिषद अधिकारी-कर्मचारी करत आहेत.

**खासगी हॉस्पिटलसाठी..**

प्रकाश आबिटकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्ह्यात खासगी हॉस्पिटलमध्ये रुग्ण दाखल झाल्यानंतर आरोग्य योजनेचा प्रत्यक्ष लाभ न देता रुग्णांना मोठ्या रकमेचे बिल भरायला भाग पाडले जाते. योजना लागू नाही असे सांगून टाळाटाळ केल्याचे प्रकारही घडले आहेत. परिणामी आर्थिक दृष्ट्या दुर्बल आणि गोरगरीब रुग्णांवर मोठा अन्याय होत आहे. खासगी रुग्णालयांकडून रुग्णांना अवाढव्य बिल आकारले जाते. मात्र यावर कोणाचेही नियंत्रण नाही. यामुळे खासगी हॉस्पिटलमध्ये रुग्णांकडून आकारल्या जाणाऱ्या बिलावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यात शुल्क नियामक समिती स्थापन करावी. या समितीमुळे खासगी रुग्णालयांकडून आकारल्या जाणाऱ्या शुल्काचे नियमित परीक्षण होईल. ही समिती गरजूंना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत राहील. तसेच शासनाने ज्या रुग्णालयांना आरोग्यविषयक योजनांअंतर्गत सेवा देण्याची परवानगी दिली आहे, त्यांच्यावर काटेकोर नजर ठेवावी व त्यांची तातडीने चौकशी करावी तसेच दोषी आढळणाऱ्या रुग्णालयांवर कठोर कारवाई करण्यात यावी, जेणेकरून भविष्यात कोणत्याही रुग्णावर अन्याय होणार नाही असे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी म्हटले आहे.

# जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांचा गुंडगिरी करणाऱ्याला दणका !

## परळी तालुक्यात गुंडगिरी करणाऱ्या धोकादायक गुंडाची हर्मुल कारागृहात रवानगी

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हयातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे व अवैदय धंदयाचे समूळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून चझऊ- कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्या अनुषधांने सपोनि पो.स्टे. सिरसाळा यांनी दिनांक २७.०२.२०२५ रोजी इसम नामे विशाल लक्ष्मण आरगडे रा. पोहनेर रोड, शिरसाळा ता. परळी जि.बीड याचे विरुद्ध चझऊ- कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता.

सदर स्थानबध्द इसमाविरुध्द पो. ठा. सिरसाळा येथे दुखापत करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, अवैध शस्त्र बाळगणे, सरकारी कर्मचाऱ्यांवर हल्ला करणे, दंगा करणे, जुलमाने घेणे, जुगार खेळणे व खेळविणे, मालमत्तेचे नुकसान करणे, घराविषयी आगळीक करणे, या व अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ०९ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदरील इसम हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे करण्याच्या सवईचा असल्याने पोलीसांची त्याचेवर बऱ्याच दिवसांपासुन करडी नजर होती. तसेच सदर इसमाने आपले वर्तन सुधारावे म्हणुन यापुर्वी उीझउ ११० प्रमाणे दि.०४.०३. २०२४ रोजी त्याचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती, परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गंभीर गुन्हे करण्याचे चालुच ठेवुन होता, त्याची सिरसाळा भागात व परळी तालुक्यात प्रचंड दहशत आहे. त्यांचे विरुध्द सर्व सामान्य लोक फिर्याद अथवा साक्ष देण्यास समोर येत नाहीत. तो सर्वसामान्य लोकांना व व्यापाऱ्यांना त्रास देवुन दहशत निर्माण करुन गुन्हे करत होता.

सदर प्रकरणात अविनाश पाठक जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी यांनी दिनांक १८.०३.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधीत राहावी हा उदात्त दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हसुल कारागृह छ. संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना सपोनि सिरसाळा व पो.नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो.नि. स्थागुशा श्री उस्मान शेख यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत सदर इसमास दिनांक १८.०३.२०२५ रोजी बीड शहरात ताब्यात घेऊन पो.स्टे. सिरसाळा येथे हजर केले आहे. पो.स्टे. सिरसाळा येथे सदर इसमास कायदेशीररीत्या ताब्यात घेऊन योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सल कारागृह, छ. संभाजीनगर येथे दि. १९.०३.२०२५ रोजी हजर करुन स्थानबध्द केले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपोअ अंबाजोगाई श्रीमती चेतना तिडके, उपविपोअ माजलगांव यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. उस्मान शेख स्थागुशा बीड, सपोनि गोरखनाथ दहिफळे, युवराज चव्हाण, बळीराम राठोड पो.स्टे. सिरसाळा यांचे सह सपोउपनि अभिमन्यु औताडे, पोह/निलेश ठाकुर, पोअं/गणेश हंगे, विबीषण चव्हाण नेमणुक स्थागुशा बीड यांनी केलेली आहे, भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटका विक्री करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुचा काळाबाजार करणारे व्यक्ती यांचेवर व दादागिरी करणाऱ्या व खंडणी बहादर धोकादायक गुंडावर जास्तीत जास्त चझऊ- कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिले आहेत.



## खऱ्या घरकुल लाभार्थ्यांनाच मंजूर झालेला हप्ता वर्ग करावा – लाभार्थी

पाली (प्रतिनिधी)

प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत ज्या लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झालेले आहेत त्यांनाच पाली ग्रामपंचायतने पुढील हप्ता द्यावा. ज्यांची पक्की घरे आहेत अशा बोगस लाभार्थ्यांना सर्वांच्या आधी हप्ता आणि खऱ्या गरजूवंत लाभार्थ्यांना वाट बघण्याची वेळ ग्रामपंचायतने येऊ देऊ नये. अन्यथा खरे लाभार्थी पाली ग्रामपंचायत समोर तीव्र आंदोलन करतील असा इशारा लाभार्थ्यांनी दिला आहे.

पाली ग्रामपंचायतने पंतप्रधान आवास घरकुल योजनेअंतर्गत ८९ मंजूर लाभार्थ्यांची यादी लावलेली आहे. मंजूर लाभार्थ्यांना पुढील हप्ता देण्यापूर्वी संबंधित इंजिनिअर साहेबांनी लाभार्थ्यांच्या घरकुलाचे झालेले बेसमेंट, मेंटल लेवल, बांधकाम, पत्रे टाकण्यापर्यंत झालेले काम पाहून साहेबांनी घरकुलाच्या हप्त्याचे रक्कम ही लाभ धारकाला देण्यात यावी. जुन्या घरावर हप्त्याची रक्कम देऊ नये. काही लाभ धारकाचे आरसीसीचे पक्की घरी आहेत त्यांना हप्ता आधी आणि खऱ्या गरजूवंत लाभार्थ्यांना वाट बघण्याची वेळ येवू देवू नये. तरी साहेबांनी व पाली ग्रामपंचायतच्या सरपंच यांनी लक्ष घालून घरकुल योजनेचा लाभ खऱ्या लाभार्थ्यांना देवून न्याय द्यावा. चिरीमिरी घेऊन संगणमताने रक्कम उचलून गैरप्रकार करू नये अन्यथा खरे लाभार्थी पाली ग्रामपंचायत समोर तीव्र आंदोलन करतील असा इशारा घरकुल लाभार्थ्यांनी दिला आहे.

## पोहरादेवी – उमरी विकासकामांना गती देण्यासंदर्भात मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिखर समितीची बैठक संपन्न

मुंबई (प्रतिनिधी)

मुंबई येथे श्री क्षेत्र पोहरादेवी येथील संत श्री सेवालाल महाराज तीर्थक्षेत्र तसेच पोहरादेवी - उमरी विकास आराखडयातील बदलांना व सुरू असलेल्या विकासकामांना गती देण्यासंदर्भात मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथ शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शिखर समितीची बैठक पार पडली.

या बैठकीत विकास आराखड्यातील आवश्यक बदलांना मंजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासोबतच राम नवमीच्या पावन दिवशी बणजारा विरासत नंगारा म्युझियम पर्यटकांसाठी खुले करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. तसेच नंगारा म्युझियमचे व्यवस्थापन व देखरेखीचे मूल्यमापन तज्ज्ञांकडून करण्यास मान्यता देण्यात आली. केंद्र व राज्य सरकारच्या अनुदानातून अन्य आवश्यक विकासकामांसाठी निधीचा वापर करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.



या निर्णयामुळे श्री क्षेत्र पोहरादेवी तीर्थक्षेत्राचा आध्यात्मिक, सांस्कृतिक वारसा जोपासण्याबरोबरच पर्यटनवाढीस चालना मिळणार आहे. या बैठकीस ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे, राज्यमंत्री ना. इंद्रनिल नाईक, राज्यमंत्री ना. माधुरी मिसाळ, राज्यमंत्री ना. योगेश कदम यांच्यासह श्री क्षेत्र पोहरादेवीचे धर्मगुरू बाबुसिंग महाराज, महंत जितेंद्र महाराज, महंत शेखर महाराज, महंत सुनिल महाराज, महंत कबीरदास महाराज, महंत यशवंत महाराज आदी मान्यवर उपस्थित होते.

## गाळमुक्त धरण–गाळयुक्त शिवार योजना प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुकास्तरावर परिपूर्ण नियोजन करा – जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर(प्रतिनिधी)

उन्हाळ्यात जलसाठ्यांमधील गाळ काढणे व तो शेतकऱ्यांच्या शेतात टाकून शेताची सुपिकता वाढविण्यासाठी गाळमुक्त धरण–गाळयुक्त शिवार हे अभियान राबविण्यात येते. या अभियानाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तालुकास्तरावर परिपूर्ण नियोजन करा. त्यासाठी गुरुवार दि.२० रोजी प्रत्येक तालुक्यात बैठक घेऊन नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले. गाळमुक्त धरण- गाळयुक्त शिवार योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात आज जिल्हास्तरीय समितीची बैठक झाली. बैठकीस उपजिल्हाधिकारी रोहयो



उमाकांत पारधी, जिल्हा जलसंधारण अधिकारी नरेंद्र कटके, तसेच भारतीय जैन संघटनेचे माजी राज्य अध्यक्ष ड. गौतम संचेती, राज्य महासचिव प्रवीण पारख, जिल्हा प्रकल्प प्रमुख किशोर ललवाणी, पारस बागरेचा, जिल्हाध्यक्ष राजेंद्र पगारिया, अभिजीत हिरप, गौतम भंडारी यांची उपस्थिती होती. तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी आदी दुरदृष्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी



## महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघाच्या वतीने शालेय शिक्षण मंत्र्यांना तहसीलदारा मार्फत निवेदन

घनसावंगी (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक महासंघ तर्फे संपूर्ण राज्यभर तहसीलदारांना मार्फत शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना निवेदने सादर करण्यात आली. याचाच एक भाग म्हणून घनसावंगी तालुक्याच्या तहसीलदार यांना कनिष्ठ महाविद्यालयीन कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघाने निवेदन दिले. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या समस्यांबाबत शासनाने चर्चा करून गेल्या वर्षी दि २२२ क़ २४ रोजी काही मागण्या मान्य करीत लेखी आश्वासन दिल्यानंतर महासंघाने बारावीच्या उत्तरपात्रिका तपासणीवरील बाहिष्कार मागे घेतला होता. त्यानंतर मान्य मागण्यांमधील १२१८ वाढीव पदांना मान्यता देण्याऐवजी सदर पदांवर

कार्यरत केवळ २८३ शक्षकांच्या समावेशनाचा आदेश काढला व राज्यात काही शिक्षकांचे समावेशन करण्यात आले. परंतु अनेक शक्षकांचे समावेशन अजून झालेले नाहो. काहींचे प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहेत.आय टी शिक्षकांच्या समायोजनाचा शासनादेश. अंशतः अनुदान प्राप्त शिक्षकांना वाढीव टप्पा सेवांतगंत आश्वासित प्रगती योजना. शाळा संहितेनुसार वगांतील विद्याथो संख्येचे निकष पाळणे इत्यादी मान्य मागण्यांचे आदेश निघाले नाहीत. त्याबाबत अनेक वेळा निवेदने देऊनही अद्याप त्यावर चर्चाही केली नाही. त्यामुळे आमच्या

तसेच सर्व शिक्षकांच्या मनात असंतोष निर्माण झाला आहे.त्यामुळे महासंघ पुन्हा आंदोलन करीत आहे.जवळपास १३ विविध मागण्यांचे निवेदन मान्य तहसीलदार मार्फत शालेय शिक्षण मंत्र्यांना देण्यात आले.

## संवेदनशील परिस्थिती लक्षात घेता बीड जिल्ह्यामध्ये २ एप्रिल पर्यंत जमाबंदी आदेश लागू

बीड (प्रतिनिधी)

पोलीस अधीक्षक बीड यांनी सध्या विविध पक्षाचे नेत्याचे प्रमुख कार्यकर्ते यांचे हाणमारीचे व्हिडीओ समोर येत आहेत.संबंधीत नेत्याचे कार्यकर्ते हे नेत्याचे समर्थनात आंदोलने करत आहेत. राजकीय पक्ष संघटनेच्या वतीने त्यांचे न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने आंदोलने, उपोषण मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. दिनांक ११/०२/ २०२५ पासुन ईयत्ता बारावीची बोर्डाची परिक्षा सुरु झाली असुन २१/०२/२०२५ पासून दहावी बोर्डाचे परिक्षा सुरु झालेली आहे यामुळे अचानक घडणारे घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या कालावधीत आरक्षणाचे मागणीसाठी सर्व समाज व राजकीय पक्ष आक्रमक आहेत. त्यामुळे जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता म.पो. अधि.-१९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे जमावबंदी आदेश लागू करणे अत्यंत आवश्यक असून दिनांक १९.०३.२०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासुन ते दिनांक ०२.०४.२०२५ चे २४.०० वाजेपर्यंत चे काळात बीड जिल्ह्यात मु.पो. अधि. चे कलम ३७ (१) (३) लागू करणेस विनंती करुन सदर कालावधीकरीता महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे या सारखे आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही.

ज्याअर्थी, पोलीस अधीक्षक, बीड यांचे अहवालावरुन जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागु करण्याची माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी शिवकुमार स्वामी अपर जिल्हादंडाधिकारी, बीड या आदेशाव्दारे असे निर्देश देत आहे की, शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याच्या जवळपास खालील गोष्टी करण्यास मनाई करण्यात येत आहे.

१. शस्त्र, सोटे, काठी, तलवार, बंदूक जवळ बाळगणार नाहीत.

२. लाठ्या, काठ्या, शारीरिक इजा होण्यास कारणीभूत ठरतील, सहज हाताळता येतील, अशा वस्तु, साहीत्य बाळगणार नाहीत.

३. कोणतेही दाहक पदार्थ किंवा स्फोटके जवळ बाळगणार नाहीत.

४. दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा फोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे गोळा करुन ठेवणार नाहीत, बाळगणार नाहीत किंवा तयार करणार नाहीत.

५. प्रक्षोभक भाषणे, अंगविक्षेपण, विडंबनात्मक नकला करणार नाही. सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे जिल्हयाची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी घोषणा फलक किंवा इतर कोणत्याही वस्तु, साहित्य जवळ बाळगणार नाहीत.

६. जाहीरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किवा कोणतीही कृती जी देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचवणारी असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचवणारी असेल अशी कृती करणार नाहीत. तसेच जाहीरपणे प्रक्षोभक भाषण व असभ्य वर्तन करणार नाहीत.

७. व्यक्ती, शव, प्रेत, आकृती किंवा त्याच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणार नाहीत.

८. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही किंवा मिरवणूक, मोर्चा काढता येणार नाही.

सदर आदेश बीड जिल्ह्याच्या हद्दीत दिनांक १९.०३.२०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दिनांक ०२.०४.२०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत लागू राहतील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकीस लागु राहणार नाहीत. अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजुरी शिवाय १५ दिवसांपेक्षा जास्त मुदतीपर्यंत अंमलात राहणार नाही. तसेच या आदेशाचे पालन करुन कोणाताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-याची पूर्वमान्यता घेणे आवश्यक असेल.सदरील आदेश शिवकुमार स्वामी,अपर जिल्हादंडाधिकारी बीड यांच्या स्वाक्षरीने पारित करण्यात आली आहे.

## बीड मतदारसंघातील प्रश्न आ.क्षीरसागरांनी सभागृहात गाजवले

मुंबई (प्रतिनिधी)

बीड मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडून आ.संदीप क्षीरसागरांनी गुरूवारी (दि.२०) रोजी सभागृहाचे लक्ष वेधले. मतदारसंघात विकासकामांना मिळालेला निधी कोविड काळात वळविल्याने रखडलेली कामे, ग्रामीण भागातील शाळांची दुरूस्ती करणे तसेच विविध सोयी–सुविधा उपलब्ध करणे, रस्ते दुरुस्ती, पुल दुरूस्ती करणे आदी मुद्दे आ.क्षीरसागरांनी अधिवेशनात गाजवले.

बीड मतदारसंघात असलेले श्री क्षेत्र कपीलधार देवस्थान हे संपूर्ण महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरून देखील भाविक याठिकाणी येत असतात. कोवीड काळाअगोदर श्री क्षेत्र कपीलधार देवस्थानच्या विकासासाठी १०० कोटी रूपयांचा विकास आराखडा मंजूर झाला होता. परंतु कोवीडच्या महामारी काळापासून याबाबतची कार्यवाही ठप्प झाली. त्यामुळे महाराष्ट्रभरातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री क्षेत्र कपीलधारचा विकास करण्यासाठी शासनाने निधीची तरतूद करावी. यासोबतच बीड मतदारसंघात एकूण ३५० शाळा आहेत, त्या शाळांमधील ५९२ शाळा खोलींची अतिशय दुरावस्था झाली आहे म्हणजे त्या अक्षरशः पडतीला आल्या आहेत. ६३ वस्तीशाळांच्या इमारतींसाठी निधीची गरज आहे. तसेच ग्रामीण भागातील अनेक रस्ते आणि पूल दुरूस्तीला आले आहेत त्यांना



मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा ३ मधून मजूरी देण्यात याव्यात. अनेक ग्रामपंचायत कार्यालयाच्या नवीन इमारतींची मागणी सातत्याने होत आहे. त्यासाठी निधी देण्यात यावा. या महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकून आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

विमानतळ होतय ही आनंदाची बाब पण....

बीडमध्ये विमानतळ होणार. या कामासाठी निधीची तरतूद करून याबाबतच्या कार्यवाहीला लवकरच सुरूवात करण्यात येईल अशी घोषणा याच आठवड्यात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार साहेबांनी याचा मनस्वी आनंद आहे. त्याबद्दल ना.अजितदादांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. परंतु बीड शहरात रहिवास करणार्या ३ लाख लोकांना पाण्यावाचून कधीपर्यंत वेठीस धरायचे! योजना आणि पाणी उपलब्ध असतानाही नागरिकांचे हाल कधीपर्यंत होऊ द्यायचे? ३६ कोटी रूपयांची तातडीने तरतूद करून बीड शहराचा मुलभूत प्रश्न देखील प्राधान्याने मार्गी लावला पाहिजे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागरांनी बीड शहराच्या जिव्हाळ्याचा असलेल्या पाणी प्रश्नावर केली. त्यासोबतच बीड येथील एमआयडीसीचा विकास करून बीड जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाचा मार्गही सुकर करावा अशी आग्रही मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहात केली.

**ग्रामीण भागातील थांबलेली कामे, बीड शहराचा पाणीपुरवठा आदी महत्वाचे प्रश्न मार्गी लावण्याची केली मागणी**



## २३ मार्चला अजितदादाच्या राष्ट्रवादीत भास्करदादाची एन्ट्री

पक्षप्रवेश सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन

धर्माबाद / अशोक पडोळे

माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत (अजित पवार गट) प्रवेशाची तारीख निश्चित झाली असून महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे संस्थापक अध्यक्ष अजित दादा पवार, मंत्री सुनील तटकरे, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासह अनेक राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत दिनांक २३ मार्च २०२५ रोजी नरसी ता. नायगाव येथे पक्षप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.शेकडो कार्यकर्त्यांसह भास्करराव पाटील खतगावकर, डॉ. मीनलताई खतगावकर, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा यांचा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या पक्षात प्रवेश होणार आहे.

या सोहळ्यास धर्माबाद, देगलूर, बिलोली, नायगाव तालुक्यातील जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी धर्माबाद येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केले आहे.यावेळी माजी जि. प. सदस्य वसंत सुगावे, माजी सभापती गणेशराव पाटील करखेलीकर, माजी सभापती रामचंद्र पाटील बन्नाळीकर, माजी उपनगराध्यक्ष रमेश तिवारी, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दीपक पाटील चोळाखेकर, शहराध्यक्ष नरेश रेड्डी आर्कलवार, नारायण पाटील रामपूरकर, वैभव कुलकर्णी, बालाजी पाटील आलुरकर, अशोक वडजे, विश्वंभर स्वामी, हनमंत किरोळे, योगेश पाटील, गोविंद पाटील सोनटक्के यांच्यासह अनेक कार्यकर्ते व पत्रकार उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन संपादक शिवराज पाटील गाडीवान यांनी केले तर सतीश पा.शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# श्री शिवाजी विद्यालयात अन्नातील भेसळ ओळखणारे प्रात्यक्षिक सादर

## अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा छत्रपती संभाजीनगरच्या वतीने जनजागृती

बीड दि. १९ ( प्रतिनिधी)- शहरातील श्री शिवाजी विद्यालयामध्ये बुधवारी सकाळी अन्न व औषधी प्रशासन प्रयोगशाळा छत्रपती संभाजीनगरच्या वतीने अन्नपदार्थातील भेसळ ओळखायची कशी याबाबत जनजागृतीपर प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. दैनंदिन जीवनातील अन्नपदार्थांमध्ये दिवसेंदिवस वेगवेगळे अपायकारक पदार्थांची भेसळ होत आहे. या अन्नपदार्थातील भेसळीला घरच्या घरी तपासायचे कसे, भेसळ आहे की नाही हे ठरवायचे कसे यासाठीची जागृती करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा छत्रपती



संभाजीनगरच्या वतीने बुधवारी सकाळी शाळेत प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.या सादरीकरणासाठी छत्रपती संभाजीनगरहुन आलेले अन्न व औषध विश्लेषण रसायनशास्त्रज्ञ सतीश बादाडे यांनी प्रात्यक्षिकासह अन्न भेसळ ओळखायची कशी याविषयीचे सविस्तर मार्गदर्शन केले. सतीश बादाडे हे श्री शिवाजी विद्यालयाचेच माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी पनीर, खवा, दूध, हळद, लाल मिरची पावडर, डाळी यामध्ये होणाऱ्या भेसळी आणि त्या भेसळी वेगवेगळ्या रसायनाच्या माध्यमातून कशा ओळखायच्या याचे प्रात्यक्षिकाद्वारे सादरीकरण केले. विषारी घटकांचे अनेक खाद्यपदार्थात भेसळ होत असल्याने विद्यार्थ्यांनी दर्जाहीन, रस्त्यावरील उघडे खाद्यपदार्थ, पॅकेट बंद खाद्यपदार्थ, शीतपेये, रंगबिरंगी मिठाया खाण्याचे टाळावे असे आवाहन केले. नेहमी दर्जेदार पदार्थांचीच निवड करावी असे त्यांनी सांगितले. ज्या खाद्यपदार्थांमध्ये भेसळ आढळेल अशा खाद्यपदार्थ विक्रेत्याविरुद्ध अन्न व औषधी प्रशासन विभागाकडे रीतसर तक्रार करावी असे त्यांनी आवाहन केले. अन्नातील भेसळीची ओळख करणारे प्रात्यक्षिक पाहून विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती झाली. त्याबद्दल उपप्राचार्य त्रंबक मातकर यांनी सतीश बादाडे व अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा संभाजीनगर टीमचे आभार मानले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचलन ज्येष्ठ शिक्षक डी.एन.कर्डिले यांनी केले. यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक राजेंद्र वाघमारे, उप मुख्याध्यापक राजकुमार कदम, पर्यवेक्षक रमेश सुपेकर, पर्यवेक्षक गिरीश चाळक, ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र भावसार,एच.आर.सावंत सर, जी. व्हि. मस्के, स्वामी,तागड सर यांची व्यासपीठावर उपस्थित होती. कार्यक्रमाला शाळेतील सर्व विद्यार्थी,शिक्षक,शिक्षके तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रियानगर,बजरंगनगर भागातील नागरिकांचा पाणी प्रश्न मार्गी लावण्याची नागरिकांची मागणी

परळी (प्रतिनिधी)

वाण धरणात पुरेसे पाणी असतानाही येथील प्रियानगर, बजरंग नगर भागातील नागरिकांना कृत्रिम पाणीटंचाईचा सामना करावा लागत. आहे. इ या भागात आठ दिवसातून एकदा पाणी सोडले जाते. तेही वेळी, अवेळी. त्याला वेळ नाही की काळ नाही. कधी पाणी येइल, किती वाजता येईल हे निश्चितच नाही. सहाव्या-सातव्या दिवसी पाणी येइल म्हणून दिवसभर वाट पहायची, नाही आलं पाणी तर दुसग्रा दिवसीही अशीच वाट पहात राहायचं . किती वाजता येयील हे निश्चित केलेलंच नाही. त्यामुळे वाट पहात रहाण्ययाशिवाय नागरिकांकडे पर्यायच नाही. नगर पालिकेने पाण्याचा दिवस आणि वेळ निश्चित करावा. आणि त्याप्रमाणे वेळच्यावेळी पाणी सोडावे अशी मागणी या भागातील नागरिकांतून होत आहे. नगर पालिकेने तात्काळ पाणी प्रश्नाकडे लक्ष देउन हा प्रश्न मार्गी लावावा अन्यथा आंदोलनाचा इशारा नागरिकांतून दिला आहे

## अग्नीवीर सैन्य भरतीसाठी ऑनलाईन नोंदणी

बीड (प्रतिनिधी)

अग्निवीर योजने अंतर्गत वर्ष २०२५-२६ साठी होणाऱ्या अग्नीवीर भर्तीसाठी अविबाहित पुरुष आणि अविवाहित महिला उमेदवारांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठीची अधिसूचना ु.क्षेळपळपवळरपरीू.पळल.ळप या वेबसाईट वर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची तारीख १२ मार्च ते १० एप्रिल राहील. सामान्य प्रवेश परीक्षा संभवता जून महिन्यात प्रसिद्ध करण्यात येईल. हे भर्ती अर्ज अहिल्यानगर, बीड, लातूर, धाराशिव, पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील उमेदवार १२ मार्च ते १० एप्रिल पर्यंत भरू शकतात. तरी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी या संधीचा फायदा घेऊन दि. १० एप्रिल पूर्वी नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

# फसवणुकीच्या आरोपातून आरोपींची निर्दोष मुक्तता

छ. संभाजीनगर (प्रतिनिधी)

दि.२०/०३/२०२५ रोजी येथील ५ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (छ. संभाजीनगर) श्रीमती यु.एम. वैद्य यांनी कलम ४२० सह ३४ अन्वये दाखल गुन्ह्या अंतर्गत फौजदारी खटला क्रमांक १८६०/२०१६ मधून आरोपी धनराज दौलतराव डोंगरे व ईतर यांची निर्दोष मुक्तता केली.

मुकुंदवाडी पोलिस स्टेशन अंतर्गत दाखल गुन्हा क्रमांक ३९७/२०१५ अन्वये फिर्यादी गणेश उत्तमराव जाधव यांनी सुंदरवाडी शिवारातील गट क्रमांक ३९ मधील प्लॉट क्रमांक ३२ बाबत वैयक्तिक स्वार्थापायी धनराज डोंगरे, ऋषिकेश देशमुख व सुभाष उप्पलवार यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. ज्यात त्यांना विक्री केलेला प्लॉट परस्पर इतरांना हस्तांतर करून फसवणूक केल्याचे नमूद केले होते.

सदर गुन्ह्याच्या तपासाअंती मुकुंदवाडी पोलिस ठाण्यामार्फत वि. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणात फिर्यादी व साक्षीदार यांची साक्ष व संबंधित दस्तऐवजांची पडताळणी करून सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात आरोपी धनराज डोंगरे यांच्या वतीने जालना येथील ॲड. दिपक बलवंत नाईक यांनी युक्तिवाद करून बाजू मांडली तर त्यांना अन्य आरोपींच्या वतीने ॲड. विक्रम होण व ॲड. पवन साळवे यांनी सहकार्य केले.



बीड - शहरातील कालिंका देवी मंदिर बलभीम चौक बीड येथे व्दितीय वर्धापन दिनानिमित्त आणि जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून समाजातील उद्योजक माहिला यांना महिला उद्योजक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. बीड शहरातून ५१ महिलांना ट्रॉफी, गुलाबाचे फुल, शाल, श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.

# महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये राबवणार सीबीएसई पॅटर्न

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वाची अपडेट समोर आली आहे. राज्यातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना लवकरच सीबीएससी अभ्यासक्रम लागू केला जाणार आहे. महाराष्ट्र बोर्डाच्या शाळांमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्याबाबतच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली आहे.

येत्या २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांपासूनच सीबीएससी अभ्यासक्रम लागू करण्याबाबत हालचाली सुरु आहेत. दरम्यान शालेय शिक्षण मंत्री दादा भूसे यांनी विधान परीषदेत यासंदर्भात माहिती दिली. विधान परीषदेत विचारलेल्या प्रश्नाला मंत्री दादा भूसे यांनी लेखी उत्तर दिले. भाजप आमदार प्रसाद लाड यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.

राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली का? असा प्रश्न आमदार प्रसाद लाड यांनी विचारला होता. सीबीएसई अंतर्गत पाठ्यपुस्तके मराठी उपलब्ध करुन दिली जाणार आहेत.

१ एप्रिलपासून सत्राची सुरुवात करण्यात येणार, असल्याची माहिती देण्यात आली.

शाळांचे वर्षभराचे वेळापत्रक यंदा कोलमडण्याची भीती

शाळांचे वर्षभराचे वेळापत्रक यंदा कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यामध्ये शिक्षण विभागाकडून अचानक पहिल्या इयत्तेपासून नवव्या इयत्तेपर्यंतची वार्षिक परीक्षा एप्रिलअखेरीस घेण्याची सूचना जारी केली. मात्र या सुचनेमुळे शैक्षणिक वर्तुळात गोंधळ उडाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या परीक्षा पूर्वीच्या वेळापत्रकानुसारच व्हाव्यात, अशी शिक्षकांसह पालकांची मागणी आहे. त्यातच आता मुंबईतील शाळांमधील मुख्याध्यापकांसमोर या निर्णयामुळे नवा प्रश्न निर्माण झाला आहे. आताच्या नव्या सुचनेप्रमाणे परीक्षा संपवून नवीन शैक्षणिक वर्षातील दहावीचा अभ्यासक्रम कधी सुरू करायचा, असा प्रश्न मुख्याध्यापकांना पडलाय.अनेक शाळांमध्ये इयत्ता दहावीचे वर्ग एप्रिल महिन्यातच घेण्यास सुरु होतात. सामान्यप्रमाणे नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्याआधी दहावीच्या मुलांचे वर्ग सुरु होतात. याच काळात दहावीच्या मुलांचा बराचसा अभ्यासक्रमही पूर्ण करतात. मात्र आता नव्या सुचनेनुसार वार्षिक परीक्षाच २२ एप्रिलपर्यंत सुरू राहणार असून त्यामुळे दहावीच्या या वर्गांचे नियोजन आता करता येणार नाही, अशी खंत शिक्षकांसह पालक आणि विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे.

विद्यार्थ्यांना उजळणीला वेळ कसा मिळणार?

मार्चमध्ये परीक्षा आटोपल्यानंतर दहावीच्या विद्यार्थ्यांचा एप्रिलमध्ये पहिल्या पंधरा दिवसांमध्ये काही अभ्यासक्रम पूर्ण केला जातो. जूनमध्ये पुढील अभ्यासक्रम सुरू करून वर्षाच्या शेवटी उजळणीसाठी वेळ मिळतो. मात्र यंदापासून दहावी आणि बारावीच्या परीक्षा



दहा दिवस आधीच घेतल्या जात असल्यामुळे पुढील वर्षी देखील या वाया गेलेल्या दिवसांचा फटका बसणार आहे, असे शिक्षकांचे म्हणणे

## धार्मिक तेढ निर्माण करून सोहार्दतेला सुरंग लावण्याचा प्रयत्न : जयदीप कवाडे

प्रतिनिधी @ बीड

छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रगाढ बुद्धिमत्ता व युद्धकौशल्याच्या जोरावर स्वराज्य निर्मिती करून विश्वात त्यांची ख्याती आहे. त्यांच्याच पाऊलशात नवीन चेतना निर्माण केली. प्रगत, पुरोगामी, शक्तिशाली महाराष्ट्र घडवणाऱ्या छत्रपतींच्या राज्यात आज जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न काही समाजकंटक करीत आहे. सोमवारी नागपुरात औरंगजेबच्या निषेधार्थ झालेल्या आंदोलनानंतर दो समुदायात झालेल्या वादाचे रुपांतर दंगलीत झाले. यात निष्पाप नागरिकांसह पोलिस कर्मचाऱ्यांवरही हिंसाचार करण्यात आले. याशिवाय स्थानिकांच्या वाहनांची जाळपोळ करण्यात आली आहे. राजकीय हेतूने राज्याचे वातावरण दुषित करण्याचा घाट होत आहे. धार्मिक तेढ निर्माण करून सोहार्दतेला सुरंग लावण्याचा प्रयत्न राज्यात होत असल्याचा आरोप पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तसेच महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) जयदीप भाई कवाडे यांनी केला. जयदीप कवाडे यांनी दंगल घडविणाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्याचे आवाहन सरकारला पत्राद्वारे केले आहे.



पुढे बोलतांना जयदीप कवाडे म्हणाले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महायुती सरकारला बदनाम करण्याचा प्रयत्न सोमवारी नागपुरात झालेल्या हिंसाचारातून याची प्रचिती होत आहे. प्रत्यक्षात काल झालेली घटना अतिशय निंदनीय असून याचा पीपल्स रिपब्लिकन पार्टी तिव्र निषेध करत असल्याचेही जयदीप कवाडे म्हणाले.

**धार्मिक तेढ निर्माण करून राज्याच्या सोहार्दतेला सुरूंग लावण्याचा कुटील डाव आज विरोधी पक्ष करीत आहे. कोणतेही मुद्दे नसताना नागपुरात दंगली घडवून पाहायला मिळत आहे. दंगलच घडवून हिंसाचारचे लोन पसरविण्याचा प्रयत्न दगडफेक कारणाऱ्यानी सोमवारी नागपुरात आपल्याला पाहायला मिळाला. यामुळे सर्वसामान्यांना प्रचंड त्रास सोसावे लागले. अश्या घटना पुन्हा होऊ नये म्हणून सरकारने दक्षता बाळगण्याची गरज असल्याचेही जयदीप कवाडे म्हणाले.**

# सह्याद्री देवराई वनप्रकल्प जगवण्यासाठी वनप्रेमींच्या पुढाकाराने पाण्याचे टँकर तर पुन्हा एकदा वनप्रकल्प आगीच्या भक्ष्यस्थानी

**सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांची पाण्याअभावी दुरावस्था झाली असुन झाडे वाळुन करण्याच्या अवस्थेत आहेत. आठवड्यात २५ हजार लिटरचे कमीत कमी ३ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार असुन आजपासून सुरुवात केली आहे. यासाठी अनिकेत कुलकर्णी, सुप्रिया कुलकर्णी, वैभव जाधव, डॉ.अक्षय भोपळे, आनंद मुंदडा, डॉ.अभिजित थेटे, डॉ.अनुराग पांगरीकर, डॉ.सिताराम आळणे,गोपवाड,जेठाराम प्रजापती, सलीम सय्यद,सुरवसे भाऊ,काळु बेग, अँड.राज पाटील, मनोज पवार,यांनी आर्थिक योगदान दिले आहे. सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील अडचणीच्या अनुषंगाने व्हिडिओ कॉल द्वारे सयाजी शिंदे यांच्याशी बोलणे झाले असून येत्या १ तारखेला वनप्रकल्पाची पाहणी करण्यासाठी ते येणार असुन जिल्हा प्रशासन, वनविभाग व वनप्रेमी, पर्यावरण प्रेमी यांच्या सोबत विचार विनिमय करून कायमस्वरूपी तोडगा काढणार असल्याचे त्यांनी सांगितले.असे डॉ.प्रदीप शेळके यांनी सांगितले.**

## डोकेवाडा तलावातुन कायमस्वरूपी पाणीपुरवठ्याची गरज :- डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी @ बीड

बीड तालुक्यातील पालवण येथील डोंगरावर २०१७ साली मराठी अभिनेते सयाजी शिंदे आणि सेने पटकथा लेखक अरविंद जगताप यांच्या प्रयत्नातून उभारलेल्या पहिले जागतिक संमेलन जागतिक वृक्ष संमेलन भरलेल्या सह्याद्री देवराई वन प्रकल्पाकडे जिल्हा प्रशासन व वनविभागाच्या दुर्लक्षामुळे घरघर लागली असुन वाळवंट होण्याच्या स्थितीत असुन पाण्याअभावी झाडे वाळली आहेत. याची दखल घेत डॉ . प्रदीप शेळके आणि त्यांचे सहकारी वृक्षप्रेमींनी टँकरद्वारे झाडांसाठी पाणीपुरवठ्याची व्यवस्था करत जागतिक वन दिनाच्या निमित्ताने स वनप्रकल्प वाचवण्यासाठी सहकार्य करावे अशी हाक दिली आहे. दुसरीकडे काल रात्री लागलेल्या आगीत पुन्हा झाडांची हानी झाली आहे. सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांसाठी पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा यासाठी पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी डोकेवाडी साठवण तलावातुन पाइपलाइन करून कायमस्वरूपी तोडगा काढावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.





काल रात्री साडे ९ च्या सुमारास सह्याद्री देवराई वनप्रकल्पातुन आगीचे लोट उठल्यानंतर लक्षात येताक्षणी वनमजूर जयराम काळे, वनरक्षक शेषेराव राऊत,वनमजुर पदमाकर मस्के यांच्या प्रसंगावधानामुळे आग लवकरच आटोक्यात आणली. २ आर वनक्षेत्रातील झाडे आगीत भस्मसात झाली आहेत. रात्री अपरात्री याठिकाणी येणाऱ्या समाजकंटकांमुळे असे प्रकार घडत असून रात्रपाळीसाठी वनकर्मचारी यांची आवश्यकता असल्याचे वनपाल देविदास गाडेकर यांनी सांगितले.

सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांसाठी कायमस्वरूपी पाणी पुरवठा व्हावा अशी मागणी तत्कालीन वन विभागीय अधिकारी के.एम.गिते यांनी करत ६७ लाख रुपये निधीची मागणी जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी सहमती दर्शवली होती.परंतु तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड अजित पवार यांनी पालवण गावासाठी येणाऱ्या जलजीवन योजनेंतर्गत कामामधुन पाणीपुरवठा करता येईल त्यासाठी वेगळा निधी खर्च करण्याची आवश्यकता नसल्याचे मत नोंदवले त्यामुळे पुढे ती योजना रखडली. पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांसाठी डोकेवाडा साठवण तलावातुन पाणीपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र निधी देण्यात यावा ज्यामुळे कायमस्वरूपी हा प्रश्न मिटेल अशी मागणी केली आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# जीवनात मिळालेल्या प्रत्येक संधीचे रूपांतर यशात करा - डॉ.राजेश इंगोले



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

वाट पाहणाऱ्या लोकांना जीवन संधी नाही तर संकटांची भेट देते त्यामुळे वाट पाहणाऱ्या लोकांच्या वाट्याला प्रयत्न करून नेणाऱ्या विजेत्यांनी जेवढे सोडलं आहे. त्यावरच समाधान मानावे लागत. त्यामुळे आयुष्यामध्ये वाट पाहण्यापेक्षा संधी निर्माण करून, मिळालेल्या संधीचे सोने करून आपल्या जीवनामध्ये प्रगतीकडे, यशाकडे वाटचाल केली पाहिजे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

अंबाजोगाई येथील व्यंकटेश नर्सिंग स्कूल येथे लॅम्प लाईटनिंग व विद्यार्थ्यांना वैद्यकीय सेवेची शपथग्रहण सोहळ्यामध्ये नर्सिंग कॉलेजच्या मुलांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर संस्थेचे प्राचार्य धनंजय शिंदे तसेच नर्सिंग महाविद्यालयाचे विभागप्रमुख प्रा.सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. आयुष्यात कष्ट करण्याची तयारी विद्यार्थ्यांमध्ये असली पाहिजे तरच जीवनामध्ये यश मिळते वैद्यकीय सेवांमध्ये व्यक्तिमध्ये सेवा, समर्पण, त्याग, साहस , प्रसंगवधान, बलिदान, प्रेम, सहकार्य, बंधुत्व हे गुण असले पाहिजेत. वैद्यकीय क्षेत्रामध्ये पाऊल टाकण्याआधी प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःमध्ये हे गुण आत्मसात करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचा पप्रयत्न करावा आणि स्वतःला ट्रान्सफॉर्म करून वैद्यकीय सेवेसाठी तयार करून घ्यावे अशी अपेक्षा डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केली. वैद्यकीय क्षेत्रामध्ये काम करत असताना माणुसकी हा गुण सदैव जागृत ठेवला पाहिजे त्यामुळे सेवा करणारा वैद्यक किंवा वैद्यकीय शाखेतील विद्यार्थी हे जात, धर्म, पंथ, लिंगभेद, गरिबी, श्रीमंती हा भेद बाजूला सारून, रूग्णाला रूग्ण मानून त्याची सेवा करेल. कोणतेही शास्त्र हे परिपूर्ण नसते, जगामध्ये दररोज नवनवीन संशोधन होत असते त्यानुसार त्या शास्त्राला बदलून घ्यावे लागते. जुन्या संकल्पना, धारणा, सूत्रे हे बदलल्यास नवीन शास्त्रशुद्ध व सिद्ध झालेल्या गोष्टींना प्रमाण मानून त्या गोष्टींना स्वीकारावे लागते. हा बदल आणि ही मानसिकता प्रत्येक वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये असली पाहिजे. वैद्यकशास्त्र हे तीव्र गतीने बदलत जाणारे शास्त्र आहे. अत्याधुनिक उपचार पद्धती, अत्याधुनिक तंत्रज्ञान हे दररोज बदलत आहे त्यामुळे वैद्यकीय विद्यार्थ्यांनी हे अत्याधुनिक ज्ञान आत्मसात करून त्याचा उपयोग समाजासाठी करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी केले. कार्यक्रमाची सुरूवात डॉक्टर राजेश इंगोले व मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ व फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना वैद्यकीय सेवेची शपथ मान्यवरांच्या हस्ते देऊन लॅम्प लाईटनिंग करून करण्यात आली. यावेळी प्राचार्य धनंजय शिंदे, प्रा.सुर्यवंशी, नर्सिंगचे अधिव्याख्याता प्रा.सोळंके व प्रा.लोमटे यांची ही समायोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पवार यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.सोळंके यांनी मानले.

# पत्रकार जेंव्हा लूक चेंज करतात..!



आष्टी (प्रतिनिधी)

दैनंदिन कामकाजा मध्ये सातत्याने व्यस्त असताना केवळ आणि केवळ आपल्या शब्द आणि लेखणीच्या सानिध्यात राहत जनसामान्यांच्या बातम्या लिहिण्यात आयुष्य अर्पण करावे लागते. हे करताना स्वतःकडे लक्ष देण्यास पत्रकार बांधवांना वेळ नसतो. यातून अनेक आरोग्याचे प्रश्न निर्माण होऊन पत्रकारांना बलिदान द्यावे लागण्याच्या अनेक घटना आहेत. परंतु अशाही वेळी अल्पवेळेत एक विरंगुळा म्हणून धार्मिक क्षेत्रावर देवदेवतांना आशीर्वादासाठी नतमस्तक झाल्यानंतर काही वेळेसाठी का होईना एक वेगळा पोशाख परिधान करून आनंद घेण्याचा मोह पत्रकारांना आवरता आलेला नाही...!

बीड जिल्ह्याच्या आष्टी तालुक्यातील पत्रकार श्रंखलेमधील ज्येष्ठ पत्रकार दैनिक झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे आणि आष्टी तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष आणि शिक्षण आणि पत्रकारिता क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्व पत्रकार प्रा. डॉ. विनोद ढोबळे यांनी नुकतेच महाकालेश्वर देवस्थानाच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले. या दरम्यान त्यांनी तेथील एका कपडा व्यापाऱ्यांकडून अध्यात्माला धरून असलेल्या पोषकाची खरेदी केली. या पोषकांनी त्यांचा लूक अर्थातच प्रचंड चेंज झालेला दिसून आला. यावेळी त्यांनी दोघांचा आवर्जून एकत्र फोटो घेतला.

# परळीतील ग्राम पंचायतीची आरक्षण सोडत जाहीर

परळी / प्रतिनिधी

परळी तालुक्यातील सन २०२५-२०३० सरपंच आरक्षण सोडत कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून दि २५ मार्च रोजी हे आरक्षण सोडत तहसील कार्यालयात संपन्न होणार आहे.परळी तालुक्यातील ९० ग्राम पंचायतीचे आरक्षण, जिल्हाधिकारी बीड यांचे अधिसूचना जा.क्र.२०२५/जिबी/डेस्क-२/२०२५-२०३० ग्रा.पं. सरपंच आरक्षण/कावि-६३३ दि.१७.०३.२०२५ अन्वये ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील राजपत्र असाधारण भाग चार-ब दि.०५.०३.२०२५ अन्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) नियम १९६४ मधील नियम ३ (अ) प्रमाणे तालुक्यातील सरपंचाची पदे वेगवेगळ्या प्रवर्गासाठी तसेच समांतर प्रवर्गासाठी आगामी पाच वर्षाकरिता (सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी) गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीकरिता सरपंच पदासाठी सोडत पध्दतीने आरक्षण दिनांक २५ मार्च २०२५ सकाळी

११:०० वाजता तहसिल कार्यालयाचे सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. तालुक्यातील ९० ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमास तहसिल कार्यालय येथील सभागृहात दिनांक २५ मार्च २०२५ सकाळी ११:०० वाजता उपस्थित राहावे असे आवाहन तहसील कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# फुलाबाई कांबळे यांचे निधन



शिरूर (प्रतिनिधी)

शहरातील प्रगती कॉम्प्युटरचे संचालक लक्ष्मीकांत कांबळे यांच्या मातोश्री फुलाबाई दगडू कांबळे यांचे मंगळवारी दीर्घ आजाराने निधन झाले.त्या ७५ वर्ष वयाच्या होत्या.त्यांच्या पश्चात दोन मुलं,एक मुलगी,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे.शहरातील अमरधाम मध्ये त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात सकाळी ९ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

# अंबाजोगाईत अन्नत्याग आंदोलनानिमित्त विविध उपक्रम

## पाचशे विधवा महिलांचा साडीचोळी देवून बाजार समितीने केला सन्मान
## ॲड.संतोष पवार शेतकरी सहवेदना पुरस्काराने सन्मानित




अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अन्नत्याग आंदोलनाच्या निमित्ताने अंबाजोगाईत बुधवारी सामुहिक उपवास करत पाचशे आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या विधवा पत्नींचा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने साडीचोळी देवून सन्मान करण्यात आला. तर यावेळी आधार माणूसकीचा या संस्थेचे अध्यक्ष ॲड.संतोष पवार यांना शेतकरी सहवेदना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याच कार्यक्रमात पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते गोविंद शेळके यांनी शेतकरी आत्महत्या कारण आणि मिमानसा या विषयावर व्याख्यान दिले. अशा विविध उपक्रमांनी अन्नत्याग आंदोलन समितीने हा उपक्रम अनोख्या पद्धतीने साजरा केला.

१९ मार्च हा दिवस शेतकरी सहवेदना दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधुन किसानपुत्र आंदोलन शेतकरी संघटना व आधार माणसूकीचा यांच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बाजार समितीचे सभापती ॲड.राजेश्वर चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते गोविंद शेळके, अन्नत्याग आंदोलन समितीचे प्रमुख तथा या आंदोलनाचे संयोजक सुदर्शन रापतवार, शेतकरी संघटनेचे कालिदास आपेट, आधार माणूसकीचा या संस्थेचे अध्यक्ष ॲड.संतोष पवार, आशा अमर हबीब, आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या विधवा पत्नींच्या प्रतिनिधी ज्ञानेश्वर मुंडे यांची उपस्थिती होती. अन्नत्याग आंदोलनाच्या निमित्ताने सामुहिक उपवास सोडण्याचा कार्यक्रम यावेळी झाला. येथील प्रगतशील शेतकरी अनिरूद्ध चौसाळकर यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला. हे सर्व उपक्रम यशस्वी करण्यासाठी माजी सरपंच वसंत मोरे, प्रा.शांतीनाथ बनसोडे, मुजीब काझी, अनिरूद्ध चौसाळकर, सुभाष बाहेती, अच्युत गंगणे, प्रा.पंडीत कराड, मदन परदेशी यांच्यासह अन्नत्याग आंदोलन सतितीचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

या व्यवस्थेला जबाबदार कोण?- गोविंद शेळके

शेतकर्यांच्या आत्महत्या दिवसेंदिवस वाढतच आहेत., शेतमालाला न मिळणारे हमीभाव, शेतकर्यांप्रती सर्वांचेच होणारे दुर्लक्ष यामुळे अस्थिर जगणं असह्य होत असल्याने शेतकरी आत्महत्येचा मार्ग पत्करतात मात्र हे शेतकर्याचं अस्तिर जीवन कोण करतं? या प्रश्नाची उकल झाली पाहिजे. आणखी किती शेतकर्यांचे बलीदान हवे आहे? या बाबतीत परिवर्तन होणार की नाही? या व्यवस्थेला जबाबदार कोण? अशा अनेक प्रश्नांवर गोविंद शेळके यांनी आपले विचार व्यक्त केले.

पाचशे विधवा महिलांचा साडीचोळी देवून बाजार समितीने केला सन्मान

शेतकरी सहवेदना दिननिमित्त येथील कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या पाचशे विधवा पत्नींचा सन्मान कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने करण्यात आला. बाजार समितीचे सभापती ॲड.राजेश्वर चव्हाण यांनी या कामी पुढाकार घेतला. समाजात शेतकरी हाच वर्ग उपेक्षित राहिला असल्याचे त्यांनी सांगितले. ही व्यवस्था परिवतीत करण्यासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज असल्याचे ॲड.चव्हाण यांनी सांगितले. यावेळी परळी येथील माजी जिल्हा परिषद सदस्य अजय मुंडे, माजी आ.संजय दौंड, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, बाजीराव धर्माधिकारी, गोविंद देशमुख व मान्यवरांच्या हस्ते यावेळी महिलांना साडीचोळी देवून सन्मानित करण्यात आले.

# पोटच्या लेकरा सारख झाडाला जपण्याची गरज

## जागतिक वनदिना निमित्त वनश्री पुरस्कार प्राप्त मेजर प्रा एस.पी. कुलकर्णी यांच मत



अंबाजोगाई ( प्रतिनिधी )

महाराष्ट्र शासनाचा वनश्री पुस्कार मिळवलेले येथील मेजर प्रा .एस.पी . कुलकर्णी यांनी मागच्या अनेक वर्षापासून वृक्ष चळवळ हाती घेतांना ५००० झाडांची लागवड केली . निसर्ग हि मानवाची हौश नसून गरज आहे , कोरोना संकटात पर्यावरणाच महत्व लोकांना पटले असून शुध्द हवा तथा ऑक्सीजन किती महत्वाचा ?हे लक्षात आले .वृक्ष लागवडीवर पोटच्या लेकराप्रमाण प्रेम करुन त्याच संवर्धन कराव असे अव्हाण त्यांनी केले .

ते म्हणाले आपण अनेक वर्षा पासून दुष्काळी झळा सहन करतो , त्याच कारण वृक्षतोड मोठी झाली . खर तर व्रक्षलागवड अता काळाची गरज असून प्रथ्वी हिरवी झाली एवढी लागवड अपेक्षित आहे .झाडे खऱ्या अर्थाने माणसाच जगण्याच साधन आहे . त्याचे फायदे आता कळून चुकले , करोना सारख्या संकटात झाडाच महत्य कळाले .वृक्ष लागवड झाली नाही तर मग मिनरल वॉटरच्या बाटल्याप्रमाणे ऑक्सीजन बाटल्या खरेदी करावी लागणार हा धोका त्यांनी बोलून दाखवला , माणसाने स्वःताच्या भौतिक सुखासाठी वृक्षाची मोठ्या प्रमाणावर तोड केली. मात्र पर्यावरणाचा ऱ्हास झाला ज्याचा त्रास आता होत आहे. मागच्या अनेक वर्षात आपण योगेश्वरी महाविद्यालयात एनसीसी विभागात काम करत असताना मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड मोहीम हाती घेतली .गाव, वसाहती, शेतात, महाविद्यालय परिसर एवढेच नव्हे तर सर्वसामान्य लोकांच्या मध्ये जाऊन जनजागृतीचे काम केलं .वाढदिवस साजरा करताना सुद्धा वृक्ष लागवड करूनच मोहिमा हाती घेतली होती. वेगवेगळे अभियान हाती घेऊन आम्ही सामूहिक चळवळ वृक्षलागवडीची राबविल्याचे त्यांनी सांगितलं .शाळा महाविद्यालयातून मुलामुलींना शिक्षण देताना वृक्ष लागवडीवर जास्त भर देण्याची गरज त्यांनी बोलून दाखवली. विशेष म्हणजे नवीन पिढीतील युवकांनी वृक्ष लागवडीवर जास्त भर देण्याची गरज आहे .आपल्या घरासमोर असेल, किंवा शेतांमध्ये असेल बांधा बांधावर युवकांनी हा उपक्रम हाती घेऊन कार्य करण्याची गरज त्यांनी बोलून दाखवली. वृक्ष लागवड करणे आणि संवर्धन करणे म्हणजे पोटच्या लेकरा सारखे काम असून झाडावर जर तसे प्रेम केलं तर खऱ्या अर्थाने आपले शहर आपले गाव हिरवगार झाल्याशिवाय राहणार नाही असं त्यांनी सांगितलं. सद्यपरिस्थितीत प्रदूषण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे त्यामुळे वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे. आपण योगदान देताना वृक्षलागवड लोकचळवळ झाली पाहिजे आणि त्यादृष्टीने प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांमध्ये जल,जमीन, जंगल याविषयी आंतरिक जिव्हाळा निर्माण करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांचे हात नवनिर्माण करण्यासाठी आहेत ते विध्वंसक वृत्ती साठी नाहीत हे संस्कार मुलांवर वृक्षारोपणाचा माध्यमातून शहीद ऑक्सिजन पार्क ची निर्मिती केली आहे असं एस पी कुलकर्णी यांनी सांगीतले.

# दगडवाडी येथील गाय व गुरे चरण्यासाठी असलेली जमीन वाचवा - समस्त दगडवाडीकर

**शिरूरकासार (प्रतिनिधी)**

**शिरूर कासार तालुक्यातील दगडवाडी येथील गावकऱ्यांना गाय गुरे चरण्यासाठी रायमोह येथील ब्राह्मण समाजाने १३८ एकर क्षेत्र दान स्वरूपात वाडी साठी दिलं होत. १९६० पासून ते आज पर्यंत ते क्षेत्र गाय व गुरे चरण्यासाठी रिक्त आहे. परंतु काही लोकांनी ही जमीन गैर पद्धतीने बळकावून नावची केली व आता त्या जमिनीची गैर पद्धतीने विक्री करत आहेत. ती जमीन गाईगुरांसाठी वाचवावी असे खुले आवाहन समस्त दगडवाडीकर ग्रामस्थांनी केले आहे.**

गट क्रमांक १८४,१८५,१८६, २१८, २२० अश्या पाच गटात ही जमीन येत असून पाच ही गटातील सातबारा वर इतर हक्कात आज ही वाडीचे सर्व जनावरे चरण्यासाठी रिक्त असा शेरा आहे. तो शेरा काढण्यासाठी सुध्दा काही लोक गैर पद्धतीने प्रयत्न करत आहे.सदरील जमीन नागरे व कठाळे यांनी गैर पद्धतीने, खोट्या वंशावळने नावाची केली व आता ती जमीन बीड पाथर्डी रोड टच येत असल्याने अमाप भावाने लोक मागत असून यामधून या लोकांना पैसे कमवायचे आहेत. सदरील जमीन विक्री करत असताना जे जे आडव येत आहे त्यांना एक एकर कोणाला पैसे देऊन हे लोक आवाज काढू देत नाही.जमीन जर खरीच स्वतः नागरे व कठाळे यांची असती तर अशी यांनी फुकट वाटली नसती. आसाराम गायकवाड यांना एक एकर लिहून दिली आणि यात तुम्ही मध्ये पडू नका अस म्हणतात.

ज्याने ज्याने आवाज उठवला त्याला फुकट हे लोक जमीन पैसा देत आहेत. वाडीतील अर्ध्या लोकांना कोणाला अर्धा एकर ,तर बाकी कोणाला दहा वीस गुंठे फुकट खरेदी करून देत आहेत. अशी फुकट जमीन का देत आहेत ? तर कोणीच याबाबत चकार शब्द काढू नये.या गोर गरीब लोकांना दहा वीस गुंठे फुकट देऊन बाकी मालमत्ता स्वतः च्या घशात घालण्याचा कुटील डाव आहे.सदरील जमिनीची होत असलेली विक्री थांबून या सर्व प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे व जिल्हाधिकारी बीड यांनी व तहसीलदार शिरूर का यांनी यात लक्ष घालावे व वाडीतील गाय गुरे चरण्यासाठी असलेलं क्षेत्र वाचवावे जर या मध्ये काहीच दखल घेतली नाही तर आम्ही सर्व ग्रामस्थ त्याच गायरण जमिनीवर दिनांक २५/०३/२०२५ रोजी सामूहिक आत्मदहन करणार करतील असा इशारा समस्त ग्रामस्थांनी दिला आहे.

# गावंदरा येथे जीएम पोर्टलच्या माध्यमातून अनियमिता ,पाच महिन्यात उचलले १६ लक्ष रुपये

## ग्रामपंचायत सदस्याची तक्रार

प्रतिनिधी ।धारूर

मागील काही दिवसापासून पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी यांचे दुर्लक्ष असल्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभारावर कसल्याही प्रकारचे नियंत्रण राहिले नाही.जीईएम पोर्टलच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गावाच्या विकासासाठी आलेल्या निधीवर सरपंच आणि ग्रामसेवक जीईएम पोर्टलच्या माध्यमातून डल्ला मारत आहेत . यातच गावंदरा येथील ग्रामपंचायत सदस्यांच्या तक्रारीनंतर या ठिकाणी पाच महिन्यात १६ लाख २० हजार रुपये रक्कम उचलल्याचे समोर आले आहे .यात मातोश्री एंटरप्रायजेच्या नावाने एकाच दिवशी पावणे अकरा लक्ष रुपये उचलल्याचेही समोर आली आहे .

मागील काही वर्षापासून पंचायत समितीमध्ये वरिष्ठांचा कसलेही प्रकारे वचक राहिला नाही .यामुळे ग्रामीण भागात १५ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून विकासासाठी आलेला निधी जीईएम पोर्टलच्या माध्यमातून बोगस पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येत आहे .वास्तविकता जीएम पोर्टलवर खरेदी करताना क्वालिटीच्या वस्तू असतात परंतु प्रत्यक्षात जीईएम पोर्टल नियमानुसार खरेदी केली जात नाही .यातून सरपंच ग्रामसेवक हे एखाद्या एजन्सी धारकास हाताशी धरून टक्केवारीप्रमाणे कामे देऊन मोठ्या प्रमाणात या जीईएम पोर्टलच्या माध्यमातून पैशाची विल्हेवाट लावतात .यातच गावंदरा येथील ग्रामपंचायत सदस्या छाया बडे यांच्या तक्रारीवरून या गावात मोठा जीईएम पोर्टलच्या माध्यमातून अनागोंदी कारभार झाल्याचे समोर आले आहे .या ठिकाणी पंधराव्या वित्त आयोगातील मिळालेली निधी मातोश्री एंटरप्रायजेच्या माध्यमातून एकाच दिवशी १० लाख ८५ हजार रुपयाचा निधी उचलला आहे तर राज एन्टरप्रायजेस अँड . सोलर पावर एजन्सीच्या नावाने ३ लाख ८२ हजार रकमेचा निधी उचलला आहे . यातून करण्यात आलेल्या कामाचा दर्जा तर अगदी निकृष्ट असून ५० टक्के सुद्धा निधी या ठिकाणी खर्च करण्यात आलेला नाही .निधीची विल्हेवाट लावण्यास सरपंचाप्रमाणेच ग्रामसेवक ही कारणीभूत आहे . कामे मात्र थातूरमातूर करून दस्तऐवज मात्र नियमानुसार बनवली जातात .जीईएम पोर्टलच्या माध्यमातून खरेदी करणारे साहित्य अगदी निकृष्ट दर्जाचे असते .निधीच्या ३० टक्के ही रक्कम यावर खर्च केली जात नसल्याच्या समोर बाबी येत आहेत .

मातोश्री इंटरप्राईजेस व राज इंटरप्राईजेस या एजन्सीने निधी उचलून काय कामे केली याची चौकशी काय होते याकडे आता गावंदरा ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे .

नोंदणी क्वालिटीची

जीईएम पोर्टलवर ग्रामपंचायत मार्फत खरेदी करताना क्वालिटीची नोंदणी केली आहे .मात्र खरेदी ही प्रत्यक्षात जीईएम प्रमाणे कसल्याही प्रकारे होताना दिसत येत नसून ती बाजारातून थातूरमातूर क्वालिटीचे साहित्य खरेदी केले आहे .खरेदी करण्यात आलेल्या साहित्याचा दर्जा हा निकृष्ट आहे .जीईएम पोर्टल वरील प्रत्यक्षात खरेदी झाल्यावर गावात विकासाची चांगली कामे होतात .परंतु तसे प्रत्यक्षात कुठेच होताना दिसत नाही .

- छाया बडे , ग्रामपंचायत सदस्य गावंदरा .

कोठ्यावधीचा भ्रष्टाचार

मागील दोन ते तीन वर्षाच्या कालावधीमध्ये धारूर पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत समितीकडे आलेल्या पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीच्या माध्यमातून कोट्यावधीचा निधी खर्च करण्यात आलेला आहे .जीईएम पोर्टलवरून खरेदी करताना ती ऑनलाईन खरेदी होणं गरजेचे असते .मात्र प्रत्यक्षात ती होत नाही .याबाबत वरिष्ठ ने प्रत्यक्षात चौकशी केल्यास यातून मोठा भृष्टाचार समोर येणार असल्याचे बोलले जात आहे .गावंदरा गावामध्ये १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून स्ट्रीट लाईट, कचरा कुंड्या, सिमेंट बाकडे, अंगणवाडी स्मार्ट टिव्ही , खुर्च्या आदी जीईएम पोर्टलवर खरेदी केल्याचे ग्रामसेवक लक्ष्मीकांत पाठक यांनी सांगितले


# वडवणीचे कैलास पाटसकर यांचे दुःखद निधन

साश्रू नयनांनी अखेरचा निरोप

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी येथील ज्येष्ठ समाजसेवक तथा प्रतिष्ठित व्यापारी कैलास गोपीनाथराव पाटसकर यांचे वयाच्या ५८ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने बुधवार दिनांक १९ मार्च २०२५ रोजी मध्यरात्री दुःखद निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी वडवणी अमरधाम याठिकाणी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी त्यांना साश्रू नयनांनी अखेरचा निरोप दिला.

वडवणी येथील ज्येष्ठ समाजसेवक तथा प्रतिष्ठित व्यापारी कैलास गोपीनाथराव पाटसकर हे अण्णा या टोपण नावाने सर्वपरिचित असे व्यक्तिमत्व होते. समाजातील प्रत्येक सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक कार्यात त्यांचा हिरारीने अग्रक्रमी सहभाग असत. नामदेव शिंपी समाजातील एक कर्तबगार व कर्तव्यनिष्ठ व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. आपल्याशी संबंधित असलेल्या प्रत्येकाच्या सुखदुःखात नेहमी ते धावून जात असत. कर्तुत्व, दातृत्व व नेतृत्व अशा सर्व ब्रीदांनी परिपूर्ण असे ते व्यक्ती होते. नामदेव समाजोन्नती परिषद महाराष्ट्र राज्य या संघटनेचे ते राज्य कार्यकारिणी सदस्य म्हणून कार्यरत होते. शिंपी समाजातील प्रत्येक कार्यात त्यांचा सहभाग हा उल्लेखनीय असाच राहिला आहे. त्यांनी मोठ्या कष्टातून व हिंमतीने अथक परिश्रमातून शून्यातून विश्व निर्मिती केलेली आहे. आपल्या कुटुंबाला एक संघपणे बांधून ठेवत कुटुबातील प्रत्येकाची जीवापाड काळजी घेणारे अण्णा असे अचानक गेल्याने सर्वांच्याच मनाला एकप्रकारे चटका बसला आहे. त्यांना हृदयाच्या जागी त्रास होवू लागल्याने मागील आठवड्यातच त्यांच्यावर बीड येथील एका खाजगी रुग्णालयामध्ये अँजिओप्लास्टी नावाची हृदयाची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. मात्र चार दिवसांपूर्वी त्यांना परत हृदयाच्या जागी त्रास जाणवू लागल्याने परत एकदा उपचारार्थ त्या रुग्णालयामध्ये भरती करण्यात आले होते. त्यातून बरे वाटू लागल्याने त्यांना बुधवार दिनांक १९ मार्च २०२५ रोजी सायंकाळी रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली होती. परंतू काळाने परत एकदा त्यांच्यावर घाला घालत रुग्णालयातून परतत असतांनाच शहरामध्येच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. लागलीच त्यांना परत रुग्णालयात घेवून जाण्यात आले. त्यांची मृत्यूशी झुंज सुरुच होती. परंतू मध्यरात्री १२:३० वाजण्याच्या



सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी दुपारी १२ वाजता वडवणी येथील अमरधाम या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी आप्तेष्ट, नातेवाईक, मित्रपरिवार, व्यापारी, पत्रकार, वकील बांधव यांसह अनेक जण उपस्थित होते. सर्वांनी दिवंगत कैलास अण्णा यांना साश्रू नयनांनी अखेरचा निरोप दिला. त्यांच्या पश्चात कुटुंबामध्ये चार भाऊ, पत्नी, मुले, मुली, नातवंड असा मोठा परिवार असून पाटसकर कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात दैनिक राजयोग.................. परिवार सहभागी

# एच पी एम कंपनी आली ताळ्यावर, रस्त्याच्या मधील कटाव भरले

केज/प्रतिनिधी

केज शहरातील मुख्य महामार्गावर पिसाटी नदी ते मधूबन हॉटेल या अंतरा वर असलेल्या रस्ता दुभाजकामध्ये सोडलेल्या यू टर्न मधील भाग खचल्याने धोकादायक कटाव निर्माण झाले होते. यामुळे वळण घेताना दुचाकी वाहनधारक विशेषतःमहिला,मुली, विद्यार्थी व वृद्धांना अपघाताचा धोका निर्माण झाला होता.यासाठी केज विकास संघर्ष समितीने एचपीएम कंपनी व प्रशासनाला निवेदने देऊन तात्काळ दुरुस्ती न केल्यास बुधवार दि.१९ मार्च रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात बेमुदत रस्ता रोको आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता.या मागणी व आंदोलनाची दखल घेऊन एच पी एम कंपनीने सोमवार पासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे.यामुळे समिती ने



## केज विकास संघर्ष समितीच्या मागणीला यश

आपले आंदोलन स्थगित केलेआहे.संबंधित कंपनी व प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन समस्या सोडविल्याबद्दल समितीच्या वतीने हनुमंत भोसले,नासेर मुंडे,शेषराव घोरपडे व संपत वाघमारे यांनी आभार व्यक्त केले आहेत.आता केज नगर पंचायतने रस्ता दुभाजका मधील साफसफाई करावी अशी मागणीही समितीने केली आहे.




केज/प्रतिनिधी

**केज येथील तहसील कार्यालयाकडून जागतिक चिमणी दिवस साजरा करण्यात आला.नायब तहसीलदार अशोक भंडारे यांनी चिमण्यांना पिण्यासाठी पाणी भांडे व्यवस्था करून चिमणी दिवस साजरा केला. उन्हाळ्यात चिमण्यांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही.चिमण्यांचे प्रमाण कमी होत चालले आहे. चिमण्यांना वाचवण्या साठी तहसील परिसरात असलेल्या झाडांना प्लास्टिकचे भांडे बांधून त्यामध्ये पाणी ठेवण्यात आले.यामुळे झाडावरच्या चिमण्यांना पाणी उपलब्ध झाले आहे हा उपक्रम सर्व नागरिकांनी हाती घेऊन आपापल्या परिसरात चिमण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करावी पक्ष्यांना वाचवण्यासाठी कृतिशील उपक्रम राबवावेत असे आवाहन भंडारे यांनी केले.**

# सरपंच पतीचा पंचायत समितीत आत्मदहन करण्याचा प्रयत्न

## केज पंचायत समितीच्या भोंगळ कारभाराला सरपंच वैतागले

केज/ प्रतिनिधी

केज तालुक्यातील घनकचरा व्यवस्थापन, सांडपाण्याचे शोषखड्डे व सार्वजनिक शौचालय बांधकाम या कामांची मोजमाप पुस्तिकेत नोंद घेऊन बिल काढण्यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्याअधिकाऱ्यांनी महिला सरपंचाकडे ५० हजार रुपयांची मागणी केली.त्या पैकी त्यांना २० हजार रुपये देऊनही ३० हजार रुपये न दिल्यामुळे त्यांनी बिल काढले नसल्याने व्यथित होऊन संतप्त झालेल्या सरपंच पतीने केज पंचायत समिती कार्यालयामध्ये आत्मदहनाचा प्रयत्न केला.केज तालुक्यातील डोका येथील महिला सरपंच कमल गोरख भांगे यांनी गावांमध्ये घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी नियोजन यासाठी आणि सार्वजनिक शौचालय याची कामे केलेली आहेत सर्व कामे पूर्ण होऊन देखील त्याची मोजमाप पुस्तिकेत नोंद घेऊन त्यांच्या बिलासाठी त्यांनी वारंवार ग्रामीण पाणी



पुरवठा विभागाकडे कागदपत्रांनिशी मागणी केली.परंतु ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचेकार्यकारी अभियंता आंधळे,कनिष्ठ अभियंता चव्हाण आणि शाखा अभियंता वंदना साळवे या दोघांनी सरपंच पती गोरख भांगे यांच्या कडे ५० हजार रुपयांची मागणी केली.गोरख भांगे यांनी कार्यकारी अभियंता आंधळे यांना त्यापैकी २० हजार रुपये त्यांना नगदी दिले.मात्र अद्यापही त्यांचे बिल निघाले नाही.त्या बाबत त्यांनी चौकशीकेली असता उर्वरित ३० हजार रुपये जो पर्यंत देणार नाहीत तो पर्यंत मोजमाप पुस्तिकेत नोंदी घेऊनबिल मिळणार नाही.अशी अरेरावीची व मग्रुरीची भाषा कनिष्ठ अभियंता चव्हाण आणि शाखा अभियंता साळवे यांनी सरपंच पती गोरख भांगे यांना वापरली.तसेच खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली.त्यामुळे संतप्त झालेल्या सरपंच पती गोरख भांगे यांनी दि. २० मार्च रोजी दुपारी ४-०० वाजण्याच्या सुमारास केज पंचायत समितीच्या इमारतीमध्ये आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.मात्र आरडा ओरड आणि आत्मदहनाची माहिती मिळताच प्रभारी गट विकास अधिकारी समृद्धी दिवाने काळे यांनी केज पोलिसांना फोन करून त्यांना पाचारण केले. पोलीस उपनिरीक्षक शैलेश जोगदंड आणि त्यांचे पोलीस नाईक शिवाजी कागदे यांनी सरपंच पती गोरख भांगे यांच्या हातातील काडीपेटी खेचून घेत त्यांना आत्मदहन करण्या पासून रोखले.दरम्यान या घटनेमुळे पुन्हा पंचायत समितीचा भोंगळकारभार समोर आल्याचे दिसुन येत आहे.



केज/प्रतिनिधी

**रूडॉल्फ डिजेल या शास्त्रज्ञाच्या प्रतिमेस श्री. राजाभाऊ कदम जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व जयंती साजरी करण्यात आली. या जर्मनशास्त्रज्ञाचा जन्म दि.१८ मार्च १८५८ रोजी झाला.ते जर्मनीतील जर्मनी इंजिनिअर म्हणून प्रसिद्ध होते.डिजेल इंधन चे ज्वलन उत्पन्न होते असा शोध या शास्त्रज्ञाने लावला.असे राजाभाऊ कदम यांनी सांगितले.या शाळेतील शिक्षक, शिक्षिका यांनी आपल्या मनोगतातून सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बाळासाहेब राठोड यांनी केले व श्रीमती गिताताई अंडील यांनी आभार मानले.**



केज/प्रतिनिधी

**अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवून पळवुन नेल्याची घटना घडून जवळपास दीड महिना झाला तरी युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होऊनही अद्याप मुलीचा शोध लागत नाही नातेवाईकांनी पोलिसांकडे विचारपूस केल्यास प्रत्येक वेळी वेगवेगळी उडवा उडवीचे उत्तर देत हे प्रकरण मिटविण्यास सांगत असल्याचा आरोप नातेवाईकांनी केल्यानंतर पीडित मुलीच्या आईने युसुफ वडगाव पोलीस ठाण्यासमोर येऊन अंगावर डिझेल ओतून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याची घटना दि.२० मार्च २०२५ गुरुवार रोजी दुपारी युसुफ सुवडगाव पोलीस ठाण्या समोर घडली सदरील महिला पोलीस ठाण्याच्या दिशेने धावत आलीआणि अंगावर डिझेल ओतून घेतले त्यामुळे उपस्थित पोलीस कर्मचाऱ्यांनी तिला रोखल्याने पुढील अनर्थ टळला.**

# ह.भ.प.विष्णु महाराज यांच्या नेतृत्वाखाली रामगड येथे संतचरित्र कथा व अखंड हरिनाम सप्ताह सोहाळ्याचे आयोजन

आष्टी (प्रतिनिधी)

संत बाळुदेव महाराज यांच्या पावन भुमीत संत मदन महाराज यांच्या कृपाशीर्वादाने, राष्ट्रसंत वामनभाऊ व राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या कृपेने श्री क्षेत्र रामगड (देविनिमगाव - लिंबोडी) येथे बुधवार दि. २ ते ९ एप्रिल या कालावधीत रामगड येथे संत चरित्र कथा, गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताह संपन्न होत आहे अशी माहिती रामगड देवस्थानचे अध्यक्ष ह. भ. प. विष्णु महाराज लिंबोडीकर यांनी दिली.

साधु संतांच्या आशीर्वादाने आणि ह. भ. प. विष्णु महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह दि. २ ते ९ एप्रिल २०२५ या कालावधीत होत आहे. या सप्ताहात व्यासपीठ चालक म्हणुन ह. भ. प. श्रीहरि महाराज नागरगोजे, ह. भ. प. राम महाराज



हिंगोलीकर, ह. भ. प. मधुकर पवार महाराज, ह. भ. प. बाबुराव आंधळे महाराज हे काम पाहणार आहेत. सप्ताहात काकडा भजन, विष्णु सहस्रनाम, गाथा पारायण, हरिपाठ, हरिकीर्तन, हरिजागर आदि धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. या सप्ताहात ह. भ. प. निलकंठ महाराज तावरे, धार्माचार्य ह. भ. प. आदिनाथ महाराज (माणिकदौडी), ह. भ. प. देविदास महाराज खिलदकर, ह. भ. प. किशोर महाराज (आळंदीकर), ह. भ. प. आदिनाथ महाराज शास्त्री, ह. भ. प. परमेश्वर महाराज केरुळकर (पंढरापूर), ह. भ. प. महंत रामकृष्ण महाराज पांगरा यांचे हरिकीर्तन होणार आहेत. बुधवार दि. ९ एप्रिल २०२५ रोजी रामगड देवस्थानचे अध्यक्ष मठाधिपती ह. भ. प. विष्णु महाराज लिंबोडीकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. या काल्याची महापंगत रामगड देवस्थानचेवतीने होणार आहे. या कार्यक्रमास लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे, आ. सुरेश धस, माजी आ. बाळासाहेब आजबे, माजी आ. भीमराव धोंडे, समाजसेवक विजय गोल्हार आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# बीड जिल्ह्यातील १९१४६ असाक्षर देणार पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी

बीड ( प्रतिनिधी )

दिनांक २३ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत जिल्ह्यातील १९१४६ असाक्षर ऋङ-छढ(वाचन, लेखन व संख्यात्मक) मूल्यमापन चाचणी देणार आहेत. प्रत्यक्ष पेपरचा कालावधी ३ तासांचा असेल ( दिव्यांगव्यक्तींसाठी ६० मिनिटे जादा वेळ) संबंधित शाळेचे मुख्याध्यापक अथवा मुख्याध्यापकांनी निर्देशित केलेले त्याच शाळेतील सेवाजेष्ठ शिक्षक हे परीक्षा केंद्र संचालक असतील. केंद्र पुरस्कृत उल्लास नव साक्षरता कार्यक्रमांतर्गत बीड जिल्ह्यात २०२२-२३ते २०२६ २७ या कालावधीत मा. श्री. अविनाश पाठक, जिल्हाधिकारी व मा. श्री. आदित्य जीवने, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात राबवला जात आहे. जिल्ह्यातील १५ वर्षे व त्याहून अधिक वयोगटातील असाक्षर व्यक्ती मध्येपायाभूत साक्षरता वाचन लेखन व संख्याज्ञान विकसित करून त्यांच्यामध्ये महत्त्वपूर्ण जीवन कौशल्य विकसित करावयाची आहेत. या कौशल्या मध्ये आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य,आरोग्याची काळजी व जागरूकता, बाल संगोपन आणि शिक्षण, कुटुंब कल्याण इत्यादी बाबींचा समावेश आहे.बीड जिल्ह्यातील तालुकानिहाय ऋङ-छढ परीक्षा देणाऱ्या असाक्षर यांची संख्यातालुका निहाय असाक्षर संख्या तालुका अंबाजोगाई १७४८, आष्टी २४८६ ,बीड ३१५३ , धारूर ८१२, गेवराई २०३४ , केज ९८७, माजलगांव १७७०, परळी २८२७, पाटोदा ११८० ,शिरुर का .१३२२ , वडवणी ८२७ एकुण असाक्षर संख्या १९१४६ अशी आहे.

ज्या असाक्षरांची उल्लास ॲपवर अद्याप नोंदणी झालेली नाही त्यांनाही परीक्षेच्या दिवशी ऑफलाईन नोंदणी करुन परीक्षा देता येईल. असाक्षर नोंदणी करण्यासाठी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांना संपर्क करावा. अशी माहिती शिक्षण विभाग योजना यांनी दिली आहे. बीड जिल्ह्यातील १००% टक्के असाक्षरांना सदर परीक्षेस उपस्थित ठेवून परीक्षा घेण्याचे आवाहन सर्व शाळांच्या मुख्याध्यापक यांना श्री. नदाफ प्राचार्य डायट अंबाजोगाई, श्री. भगवान फुलारी शिक्षणाधिकारी (प्रा), श्री. नागनाथशिंदे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व श्री. संजय पंचगल्ले शिक्षणाधिकारी (योजना) यांनी आवाहन केले आहे.




# प्रशासनाच्या दूर्लक्षीत जलजीवन योजनेच्या कामामुळे युवकाचे आमरण उपोषण

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील जलजिवन मिशन अंतर्गत होत असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेचे काम अर्धवट करण्यात आले आहे त्यामुळेजिवाचीवाडी येथील गावकऱ्यांना ऐन उन्हाळ्यात खूप मोठा त्रास सहन करावा लागत आहे तसेच नागरिकांना पाणी पीण्यासाठी नाही त्यामुळे जिवाचीवाडी येथील गावकऱ्यांचे असे काम झाले की,धरण उशाला अन कोरड घशाला म्हटल्यासारखे काम जिवाचीवाडी गावकऱ्यांचे झाले आहे. कारण कोट्यवधी रुपयांची योजना मंजूर करण्यात आली आहे परंतु गावकऱ्यांना पाणी पिण्यासाठी नाही हे मोठे दुर्दैव आहे.त्यामुळे गावा तील युवक भागवत चौरे यांनी प्रशासनाला निवेदन देऊन काल दि.२० मार्च २०२५ रोजी आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे तरी प्रशासनाने तातडीने आमरण उपोषणाची दखल घेऊन आमरण उपोषन थांबवावे व तात्काळ काम सुरू करण्यात यावे अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# अंबाजोगाईत विजांच्या कडकडाटासह पाऊस, वाचा



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई शहरांसह परिसरात गुरुवारी सांयकाळी ७ च्या सुमारास विजांच्या कडकडाटासह पावसानं हजेरी लावली. मागील काही दिवसांपासून प्रचंड उकाडा वाढल्याने नागरिक त्रस्त झाले होते. मात्र, गुरुवारी आलेल्या पावसामुळं वातावरणात गारवा निर्माण झाल्यानं नागरिकांची उकाड्यापासून सुटका झाली.

आज दिनांक २० मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास विजांच्या कडकडाटात अंबाजोगाई परिसराला पावसाने झोडपले. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. दरम्यान, हाती आलेल्या माहितीनुसार अंबाजोगाई तालुक्यातील अनेक भागात विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली आहे. पावसाने हजेरी लावल्यामुळे शहरातील वीज पुरवठा खंडित झाला होता, अशी माहिती प्राप्त झाली आहे.

# वाढीव वॅटच्या विरोधात बंद पाळत विरोध

परळी / प्रतिनिधी

परमिट रूम लायसेन्स फी वाढ १५% व १०% व्हॅट परमिट रूमला लावले बद्दल निषेधार्त शहरात बंद ठेवत बीड जिल्हा हॉटेल व परमिट रूम असोसिएशन मार्फत विरोध करण्यात आला.महाराष्ट्र शासनाने २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये मध्ये १५% फीस वाढ केली आहे. तसेच मागील वर्षापासुन परमिट रूमला १०% व्हॅट भरावा लागत आहे.

या दोन्ही निर्णयामुळे अनुज्ञप्ती धारकांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होणार असून सदरची अन्याय धारक वाढ रद्द होण्याबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी परळी शहरात गुरूवार दि.२० मार्च रोजी परळी तालुक्यातील सर्व परमिट रूम व बार बंद ठेवून निषेध करण्यात आला. यावेळी असोसिएशनचावतीने तहसीलदार मार्फत शासनाला निवेदन देण्यात आला. या निवेदनावर असोसिएशनचे सुखदेव भगवान कांदे, अशिष अनंतराव हांगे, विष्णु ज्ञानोबा तांबडे यांच्यासह अनेक हॉटेल मालकांच्या स्वाक्षरी आहेत.